रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक २३४
www.ramprahar.com
मंगळवार, १२ मार्च २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## मिशन दिव्यास्त्र यशस्वी; पंतप्रधान मोदींकडून कौतुक



**नवी दिल्ली :** भारताच्या अग्नी ५ या क्षेपणास्त्राची पहिली उड्डाण चाचणी अर्थात 'मिशन दिव्यास्त्र'ची यशस्वी चाचणी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे हे स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित आहे. यासाठी पंतप्रधानांनी डीआरडीओ म्हणजेच संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेच्या शास्त्रज्ञांचे अभिनंदन केले. या क्षेपणास्त्रात तीन स्टेजचे रॉकेट बूस्टर आहेत, जे घन इंधनावर चालतात. याचा वेग आवाजाच्या वेगापेक्षा २४ टक्के जास्त आहे. म्हणजेच एका सेकंदाला ८.१६ किमीपर्यंत अंतर कापते. या संदर्भात केलेल्या पोस्टमध्ये पंतप्रधान मोदींनी म्हटले की, मल्टिपल इंडिपेंडेंटली टार्गेटेड री एंट्री व्हेईकल (एमआयआरव्ही) तंत्रासह स्वदेशी रूपात विकसित अग्नी ५ क्षेपणास्त्राची पहिली चाचणी, मिशन दिव्यास्त्र यशस्वी करून दाखवल्याबद्दल मला डीआरडीओच्या शास्त्रज्ञांचा अभिमान आहे.

### अंतरंग
एका दिवसात एक कोटींहून अधिक मालमत्ता करवसुली/२
खालापुरात एकाला जबर मारहाण; गुन्हा दाखल/५
न्हावे येथे सरपंच चषक क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन/८

# देशभरात 'सीएए' लागू

## मोदी सरकारचा मोठा निर्णय; अधिसूचना प्रसिद्ध

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने सोमवारी (दि.११) सीएए अर्थात नागरिकत्व सुधारणा कायदा देशभरात लागू केला असून त्या संदर्भातील अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. या कायद्यात पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तान या तीन देशांमधील अल्पसंख्याकांना भारतीय नागरिकत्व देण्याची तरतूद करण्यात आली आहे. हिंदू, बौद्ध, जैन, शीख, पारशी आणि ख्रिश्चन या सहा धार्मिक अल्पसंख्याक लोकांना भारताचे नागरिकत्व देण्याचा भारत सरकारचा प्रयत्न आहे.

सद्यस्थितीत भारताचे नागरिकत्व मिळवण्यासाठी कुठल्याही व्यक्तीला भारतात किमान ११ वर्षे राहणे आवश्यक आहे, परंतु सीएएमुळे ही अट शिथील होऊन सहा वर्षांवर आली आहे. डिसेंबर २०१९मध्ये सीएए विधेयक संसदत मंजूर झाले होते. या कायद्याला राष्ट्रपतींची संमतीदेखील मिळाली, पण




देशाच्या अनेक भागांमध्ये मोठ्या प्रमाणात निदर्शने झाली तसेच त्यानंतर आलेल्या कोरोनामुळे या कायद्याची अंमलबजावणी लांबवणीवर पडली होती.

केंद्र सरकारने आगामी लोकसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर होण्यापूर्वी देशात सीएए लागू करण्याची तयारी सुरू केली होती. गृहमंत्री अमित शाह यांनी त्यांच्या निवडणूक भाषणांमध्ये अनेकदा याबाबत सुतोवाच केले होते. लोकसभा निवडणुकीपूर्वी त्याची अंमलबजावणी केली जाईल, असेही त्यांनी जाहीर केले होते. अखेर सोमवारी केंद्र सरकारने या कायद्याच्या अंमलबजावणीबाबतची अधिसूचना प्रसिद्ध केली. सरकारच्या या निर्णयानंतर सीएएमध्ये असलेले सर्व नियम देशभर लागू केले जाणार आहेत.

## कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून चिपळे, बोनशेत येथे विकासकामे

### भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुभारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख तथा पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून तालुक्यातील चिपळे आणि बोनशेत येथे विविध विकासकामांचा शुभारंभ भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते सोमवारी (दि.११) झाला.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सक्षम नेतृत्वाखाली पनवेलमध्ये विकासाची अनेक कामे होत आहेत. त्यांच्या स्थानिक विकास निधीतून चिपळे येथील एकनाथशेठ म्हात्रे यांचे फार्म हाऊस ते चिपळाई देवी मंदिर परिसर काँक्रीट रस्त्याचे भूमिपूजन आणि जिल्हा वार्षिक योजनेतून बोनशेत येथील स्टॉपवर मोरी बांधणे या कामाचे भूमिपूजन भाजपे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमांना नेरे विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, चिपळे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रमेश पाटील, माजी उपसरपंच धनंजय पाटील, मुकेश फडके, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, **(पान २ वर..)**

## पुरस्कारप्राप्त महिलांचे कार्य इतरांना स्फूर्तिदायक -लोकनेते रामशेठ ठाकूर

### यमुना स्त्री सन्मान पुरस्कारांचे वितरण





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेच्या वतीने ज्या महिलांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे त्या महिलांनी केलेले कार्य हे इतरांना स्फूर्ती देणारे असल्याचे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सोमवारी (दि.११) केले. ते यमुना स्त्री सन्मान पुरस्कार सोहळ्यात बोलत होते.

स्व.यमुनाबाई तुकाराम घरत यांच्या पुण्यतिथीनिमित्ताने सामाजिक, शैक्षणिक, कामगार, राजकीय, कला, क्रीडा आणि सेवा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांच्या सन्मानार्थ यमुना स्त्री सन्मान पुरस्कार सोहळा संस्थेचे अध्यक्ष तथा कामगार नेते महेंद्र घरत यांच्या वतीने शेलघर येथे आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर बोलत होते. या वेळी त्यांनी महेंद्र घरत यांची काम करण्याची पद्धत वेगळी आहे. जबाबदारी टाकली की ती पार पाडण्याचे काम करतो, अशा शब्दांत त्यांचे कौतुक करीत शांतीवन कुष्ठरोग निवारण समितीला १० लाख रुपयांची अर्थिक मदत जाहीर केली.

या समारंभास भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, उद्योजक जे.एम.म्हात्रे, डॉ. गिरीश गुणे, रघुनाथ घरत, ॲड. प्रमोद ठाकूर, उद्योजक जमीर शेख, गुलाबशेठ घरत, पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख, अतुल पाटील, बबन पाटील, किशोर पाटील, मिलिंद पाडगावकर, मार्तंड नाखवा, जयवंत देशमुख, शरद खारकर, श्रीकांत घरत, शुभांगी घरत, कुणाल घरत, मयुरेश चौधरी, सोनाली घरत-चौधरी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते. **(पान २ वर..)**

## धनगर समाजाला खारघर येथे भूखंड

**मुंबई : प्रतिनिधी**

धनगर समाजास नवी मुंबईत भूखंड उपलब्ध करून देण्याचा निर्णय सोमवारी (दि.११) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. खारघर नोड येथील सेक्टर ५मधील भूखंड क्र.४६ बी हा चार हजार चौ.मी. भूखंड धनगर समाजास देण्यात येईल.

सिडकोच्या प्रचलित धोरणानुसार भाडेपट्टा अधिमूल्य आकारून जाहिरातीने भूखंडाचे वाटप करण्यात येते, मात्र याबाबतीत अपवाद करण्यात येऊन इतर मागास बहुजन कल्याण विभागास भाडेपट्ट्याने थेट वाटप करण्यात येईल. या विभागाने संबंधित समाजाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या संस्थेला हा भूखंड योग्य रक्कम आकारून पोट भाडेपट्ट्याने हस्तांतरित करावयाचा आहे.

या संदर्भात अभिनव समाज फाऊंडेशन या धनगर समाजासाठी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेने भूखंड मिळविण्याबाबत विनंती केली होती.

## निवडक

### धावत्या बसवर विजेची तार पडून चार जणांचा मृत्यू

**गाझीपूर** : उत्तर प्रदेशातील गाझीपूरमध्ये धावत्या बसवर उच्च विद्युत दाबाची तार पडून चार जणांचा आगीत होरपळून मृत्यू झाला आहे. बसमधील इतर अनेक प्रवासी जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार बसमध्ये लग्नाला जाणारे वऱ्हाड होते. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या अपघाताची माहिती मिळाल्यानंतर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी शोक व्यक्त केला आहे तसेच मदत आणि बचाव कार्य जलद गतीने करण्याचे आदेश दिलेत.

### सीईटी परीक्षेचे अर्ज भरण्यास मुदतवाढ

**पुणे** : राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे (सीईटी सेल) शैक्षणिक वर्ष २०२४-२५करिता घेण्यात येणाऱ्या एमएचटी सीईटी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करण्यासाठी अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे ही परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना आता १५ मार्चपर्यंत विलंब शुल्कासह ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहे.

## मुंबई कोस्टल रोड प्रकल्पाची दक्षिणवाहिनी मार्गिका अंशतः खुली



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील बहुप्रतिक्षित कोस्टर रोड अर्थात किनारी रस्ता प्रकल्प (दक्षिण) ची वरळी ते मरीन ड्राईव्ह दक्षिणवाहिनी मार्गिका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सोमवारी (दि. ११) अंशतः खुली करण्यात आली. या वेळी बोलताना मुख्यमंत्र्यांनी कद्रू लोकं श्रेय देऊ शकत नाहीत. कोत्या मनोवृत्तीच्या लोकांचे ते काम नाही. ते फक्त अडथळे आणतात, असे म्हणत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर नाव न घेता जोरदार टीका केली.

या सोहळ्यास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, शालेय शिक्षणमंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, कौशल्य विकासमंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, माजी केंद्रीय राज्यमंत्री मिलिंद देवरा, स्थानिक लोकप्रतिनिधी, बृहन्मुंबई महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक इकबालसिंह चहल, अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे, डॉ. अश्विनी जोशी आदी उपस्थित होते.

या प्रकल्पाला धर्मवीर, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता (दक्षिण) असे नाव देण्यात आल्याची माहिती या वेळी देण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते महिलांच्या बसला हिरवा झेंडा दाखवून किनारी रस्त्याच्या मार्गिकेचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला.

## तळोजा पापडीपाडा येथील मदार कॉलनीला २५ वर्षांनंतर पाणीपुरवठा सुरू

### आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांचे मानले आभार

**पनवेल : प्रतिनिधी**


पनवेल महापालिका हद्दीत समावेश झालेल्या तळोजा पापडीपाडा येथील मदार कॉलनीला २५ वर्षांनंतर पाणीपुरवठा सुरू झाला आहे. त्याबद्दल तेथील महिलांनी भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांना धन्यवाद दिले आहेत.

तळोजा पापडीपाड्यातील मदार कॉलनीमध्ये स्वतंत्र नळजोडणी नसल्याने तेथील नागरिकांना पापडीपाडा येथे येऊन पाणी भरावे लागत असे. अनेक वेळा एका हंड्यासाठी दोन-दोन तास वाट पहावी लागायची. त्यामुळे महिला त्रस्त झाल्या होत्या. पनवेल महापालिका झाल्यावर माजी सरपंच मुनाफ पटेल, निर्दोष केणी, भाजप तळोजा अध्यक्ष शफी पटेल, माजी नगरसेवक हरेश केणी यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना येथील पाण्याचा प्रश्न सोडविण्याची विनंती केली. **(पान २ वर..)**





आम्हाला खूप आनंद झाला, कारण पाणी नसल्याने घरात इतर कामासाठी खारे पाणी वापरायला लागत होते, तर पिण्यासाठी गोड पाणी विकत घ्यावे लागत होते, परंतु आता नळाला रमजानपूर्वी पाणी आल्याने आम्हाला खूप आनंद झाला आहे. **-अफसाना पठाण**



आम्हाला पाण्यासाठी वणवण फिरावे लागत होते. अनेक वेळा जेथून पाणी घ्यायचो त्यांच्या शिव्या खायला लागायच्या. कोणाची बोलणी ऐकायला लगायची. आमची मजबुरी होती. पाहुणे आले की लाज वाटायची. आज आमच्याकडे पाणी आल्याने खूप आनंद झाला आहे. **-नमिता जयस्वार**

आज आम्हाला खूप आनंद झाला आहे. मी शिक्षिका असून आमचे कुटुंब २५ वर्षे पापडीपाडा (मदार) येथे राहत आहे. माझे १५ वर्षांपूर्वी लग्न झाल्यापासून मी येथे आहे, मात्र पाणी नसल्याने हैराण झाले होते. एक वेळ जेवण नसले तरी चालेल पण पाणी हवे. पाण्यासाठी खारघरपासून तळोजापर्यंत फिरावे लागायचे. दोन-अडीच हजार खर्च करावे लागत होते. आता आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, शफी पटेल, निर्दोष केणी, मुनाफ पटेल यांच्या प्रयत्नाने पाणी मिळाले. त्यांना मनापासून धन्यवाद!



**-स्नेहल डोंगरे**

## माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते विकासकामांचे भूमिपूजन

### नौपाडा येथे कार्यक्रम




**कामोठे : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या माध्यमातून कामोठे येथील नौपाडा गावात मुख्य रस्त्याचे काँक्रीटीकरण तसेच इतर अनुषंगिक कामांचे भूमिपूजन माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि.११) झाले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महापालिका क्षेत्राचा वेगाने विकास होत असून माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली अनेक कामे मार्गी लागत आगत आहेत. त्या अनुषंगाने कामोठे येथील नौपाडा गावातील मुख्य रस्त्याचे काँक्रीटीकरण आणि इतर अनुषंगिक कामे एक कोटी ८० लाख ८२ हजार ९४१ रुपये खर्चून करण्यात येणार आहेत. या कामांचा शुभारंभ माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाला.

या समारंभास भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक विकास घरत, विजय चिपळेकर, गोपीनाथ भगत, माजी नगरसेविका अरुणा भगत, प्रदीप भगत, काका भगत, एस.के. भगत, भाऊ भगत, युवा मोर्चा कामोठे शहर अध्यक्ष तेजस जाधव, विनोद खेडकर, प्रवीण कोरडे, विकास बेकावडे, सुयोग वाफारे, प्रथमेश सातपुते यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## महाडमध्ये दगडाने ठेचून एकाची हत्या, नंतर जाळून टाकले

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील वहुर गावात एका बांधकामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या कामगाराचा दगडाने ठेचून खून करण्यात आला आहे तसेच पुरावा नष्ट करण्यासाठी आरोपीने या मयत व्यक्तीचे शव जाळून टाकण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी तपास करून आरोपीला ताब्यात घेतले आहे. ठेकेदारीच्या वादातून ही हत्या झाल्याचे समोर आले आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार वहूर गावच्या उगवती वाडीमध्ये एका खासगी जागेच्या संरक्षक भिंतीचे काम सुरू होते. या ठिकाणी काम करणारे कामगार समोर असलेल्या हनिफ प्लाझा या इमारतीमध्ये रात्रीच्या वेळी राहत. या इमारतीसमोर सोमवारी (दि.११) जळालेल्या अवस्थेतील एक शव आढळले. याची माहिती मिळताच पोलीस उपविभागीय अधिकारी शंकर काळे यांच्यासह महाड शहर पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी त्या ठिकाणी दाखल झाले. त्याचप्रमाणे अलिबाग येथून श्वानपथकदेखील पाचारण करण्यात आले. तपासादरम्यान हे शव या ठिकाणी काम करणाऱ्या कामगाराचे असल्याचे निष्पन झाले.

या ठिकाणी काम करणारे आरोपी छगन शामराव मोहिते (वय ३६, मूळ रा. मलकापूर जालना) आणि मयत लखन बाबाराव चव्हाण (२२, मूळ रा.जाफराबाद, जालना) या दोघांमध्ये ठेकेदारीवरून नेहमी होणारा वाद विकोपाला गेला आणि आरोपी छगन मोहिते यांनी लखन चव्हाण याची दगडाने ठेचून हत्या केली. त्यानंतर मयत व्यक्तीला इमारतीच्या मोकळ्या जागेतून बाहेर खेचत आणून समोरील नाल्यात टाकून जाळून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. सध्या आरोपी हा महाड शहर पोलिसांच्या ताब्यात असून त्याच्यावर भा.दं.वि कलम ३०२/३०१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

# महाराष्ट्रात ग्रीन हायड्रोजनच्या वापरास प्रोत्साहन -मुख्यमंत्री शिंदे

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात नाविन्यपूर्ण प्रकल्पांवर भर देण्यात येत आहे. अपारंपारिक व नविनीकरणीय ऊर्जा स्रोतांतील सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, ग्रीन हायड्रोजन या पर्यायांवर अंमलबजावणी केली जात आहे. ग्रीन हायड्रोजनचा वापरास प्रोत्साहन देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित यांची अंतर्गत महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) सहयोगी कंपनीच्या वतीने विविध जिल्ह्यातील पाच भव्य प्रकल्पांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत दूरदृष्टी प्रणालीद्वारे सोमवारी (दि. ११) शुभारंभ व भूमिपूजन करण्यात आले. या वेळी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते.



मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृह येथून बृहमुंबई महापालिका समवेत फ्लोटिंग सोलार अडीच हजार मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पासाठीचा सामंजस्य करार, मुख्यमंत्री सौर उद्योग उत्थान प्रकल्प (एम.एस.एम.इ) अंतर्गत ४०० मेगावॅट क्षमतेचा शुभारंभ, ठाणे जिल्ह्यातील दूधनी वापे येथे कार्बन न्यूट्रल प्रकल्पाचे भूमिपूजन, सातारा जिल्ह्यातील मोळ या ठिकाणी १०० मेगावॅट सौरऊर्जा प्रकल्पाचे भूमिपूजन, रत्नागिरी रेल्वे स्थानक येथे एकात्मिक शितगृह प्रकल्पाचे भूमिपूजन मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील व कोकण रेल्वेचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक संतोष झा हे व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे तसेच मुंबई महापालिकेचे इकबाल आयुक्त चहल, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव सुमंत भांगे, महाप्रित व महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अमोल शिंदे उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, महाप्रितने तीन वर्षांपासून महामंडळाची सहयोगी कंपनी म्हणून काम करताना उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. राज्य सरकारने ग्लोबल वार्मिंग व क्लायमेट चेंजसाठी लढताना महाराष्ट्रातील ऊर्जा क्षेत्रात अपारंपारिक स्रोतांतुन वीज निर्मिती करण्यास प्राधान्य दिले आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातील विकासाची गती वाढविली आहे.

**महाराष्ट्राच्या विकासाला मोठी गती मिळाली आहे. इको सिस्टम मजबूत करताना उद्योग, रोजगार निर्मिती केली जाते आहे. सौर ऊर्जेसाठी जास्तीत जास्त प्रयत्न केले जात असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पाचट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेसाठी महाराष्ट्र उद्योग, ऊर्जा आदी क्षेत्राच्या माध्यमातून एक ट्रीलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी गती घेतली आहे.**


**-अजित पवार, उपमुख्यमंत्री**

# एका दिवसात मालमत्ता कराची एक कोटींहून अधिक वसुली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्ती पूर्व नोटीसा दिल्यानंतर आता मालमत्ता कर भरण्यास नागरिकांचा प्रतिसाद वाढला आहे. सोमवारी कळंबोली मार्बल मार्केट, कामोठे, खारघर, पनवेल येथून वसुली पथकांच्या माध्यमातून एक कोटी हून अधिक थकित कर वसूल करण्यात आला आहे. दरम्यान, आयुक्त गणेश देशमुख यांच्या सुचनेप्रमाणे जप्तीपुर्व नोटीसानंतर सात दिवस दिवसांचा कालावधी पूर्ण होऊनही मालमत्ता कर न भरलेल्या थकबाकीदारांना वॉरंट नोटीसा बजावण्याच्या कामास वेग आला आहे.

आतापर्यंत पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील विविध नोडमध्ये सुमारे ३९० हून अधिक जप्तीपूर्वीच्या नोटीसा व १४ वॉरंट नोटीसांचे वाटप थकबाकीदार मालमत्ता धारकांना दिल्याने थकबाकीदारांचे धाबे दणाणले आहेत. आयुक्त गणेश देशमुख यांच्या सुचनेनूसार जप्ती मोहीम अधिक तीव्र करण्याचा इशारा महापालिकेच्या वतीने देण्यात आला आहे.



आजवर महापालिकेने सातत्याने नागरिकांना सवलती देऊन मालमत्ता कर भरण्याबाबत आवाहन केले आहे, परंतु आता महापालिकेने थकबाकीदारांच्या विरोधात कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. ज्या थकबाकीदारांना जप्ती नोटीसा दिल्या होत्या, अशा थकबाकीदारांकडून मालमत्ता कर वसुलीसाठी करअधिक्षक महेश गायकवाड तसेच कर अधिक्षक सुनील भोईर यांच्या नेतृत्वाखाली वसुली पथकाच्या माध्यमातून पनवेल, कामोठे खारघर तसेच कळंबोलीतील मार्बल मार्केट मधून सुमारे ६५ लाखांहून अधिक वसूली करण्यात आली. तसेच केएलई महाविद्यालयाने ४५ लाखांचा मालमत्ता कर भरला आहे. आज एका दिवसात एक कोटीहून अधिक मालमत्ता कराचा भरणा पालिकेच्या तिजोरीत झाला आहे.

दरम्यान, मालमत्ता कर न भरल्यास त्याच्या शास्तीमध्ये प्रतिमहा दोन टक्क्यांची वाढ होत असल्याने तसेच नागरिकांनी आपला मालमत्ता कर भरावा असे आवाहन सातत्याने रिक्षामधून लाऊड स्पीकरच्या माध्यमातून चारही प्रभागांमध्ये केले जात आहे. या आवाहनाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद दिसून येत आहे. गेल्या दोन-तीन दिवसांपासून मालमत्ता कराच्या भरण्यामध्ये वाढ होताना दिसत आहे.

## उपमुख्यमंत्री फडणवीसांची जनसेवा कार्यालयास भेट

**पनवेल : वार्ताहर**

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पनवेल येथील मध्यवर्ती पुरावा व्यवस्थापन कक्षाच्या उद्घाटनाला येत असताना तत्पूर्वी त्यांनी शहरातील भाजप प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील यांच्या जनसेवा कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. या वेळी त्यांचे स्वागत भाजपच्या वतीने करण्यात आले.

या वेळी महाराष्ट्र भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य बाळासाहेब पाटील, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील,प्रदेश कार्यकारणी सदस्य सिद्धार्थ बांठिया आदी उपस्थित होते.



# सीकेटी जुनिअर कॉलेजमध्ये महिला दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयात स्वर्गीय जनार्दन भगत साहेबांच्या ९६व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत 'जागतिक महिला दिन' झाला.



कार्यक्रमाचे आयोजन एनएसएसचे कार्यक्रम अधिकारी विवेक पाटील आणि गणेश पाटील यांनी केले तर स्नेहा शिंदे आणि सम्यक कांबळे या विद्यार्थ्यांनी निवेदन केले. सहशिक्षिका माधुरी पाटील आणि तृप्ती जोशी यांनी सुरुवात केली. प्रमुख पाहुण्या म्हणून माजी विद्यार्थीनी तथा माजी नगरसेविका ॲड. वृषाली वाघमारे होत्या. कार्यक्रमाला मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, उच्च माध्यमिकचे प्राचार्य प्रशांत मोरे, इंग्रजी प्राथमिकच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षिका वैशाली पारधी, इंग्रजी माध्यमिक पर्यवेक्षिका नीरजा अधूरी, कला वाणिज्य विभाग पर्यवेक्षक अजित सोनवणे, विज्ञान विभाग पर्यवेक्षिका स्वाती पाटील आदी उपस्थित होते.

प्राचार्य प्रशांत मोरे यांनी महिला दिनाचे महत्त्व सांगितले. सहशिक्षिका योगिता जोरी यांनी मनोगत व्यक्त केले. तर पल्लवी कर्पे व सुचित्रा मेबेल यांनी गीत व दिलीप पाटील आणि सुप्रिया सपकाळ यांनी कविता सादर केली. रेखा दिवेकर, सहशिक्षक अरुण पाटील सचिन घरत यांचा सन्मान करण्यात आला. प्रमुख पाहुण्या ॲड. वाघमारे यांनी शिक्षकांचे ऋण व्यक्त केले तसेच या शाळेतील आपल्या आठवणी त्यांनी सांगितल्या. दिनेश पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## शेअर्स मार्केटमध्ये पैसे गुंतवण्याच्या बहाण्याने १७ लाखांचा ऑनलाईन गंडा

**पनवेल : वार्ताहर**

शेअर्स मार्केटमध्ये पैसे गुंतवण्यास सांगून जास्त पट रक्कम मिळेल असे आमिष दाखवून १७ लाख ११ हजार रुपये ऑनलाईन स्वीकारून फसवणूक केल्याप्रकरणी निमिषा, शशी आणि त्यांचे साथीदार यांच्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

सौरभ सूर्यकांत गुप्ता हे रांजणपाडा, खारघर येथे राहतात. ते शेअर बाबत फेसबुकवर माहिती पाहत असताना फेसबुकवर एक पेज ओपन झाला. त्यावरील लिंक वर क्लिक केले असता ते व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपला जॉईन झाले. या वेळी निमिषा हिने व्हॉट्सअ‍ॅप वर लिंक पाठवून शेअर मार्केटचे ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. त्याने डाऊनलोड केले. या वेळी एक लाख रुपये पाठवले. त्यानंतर वारंवार शेअर्स खरेदीसाठी ऑनलाईन पैसे पाठवण्यास सांगितले. त्यांनी ते पाठवले. निमिषा, शशी व त्यांचे इतर साथीदार यांनी शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवणूक करण्यास सांगितले आणि गुंतवलेल्या रकमेच्या दहा पट जास्त रक्कम मिळेल असे खोटे सांगून शेअर मार्केटिंगचे दोन बनावट ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. त्यांनी एकूण १७ लाख ११ हजार रुपये पाठवून दिले.

शेअर मार्केटच्या ॲपमध्ये दिसणारी रक्कम त्यांच्याकडे मागितली असता त्यांनी टॅक्स रक्कम भरावी लागेल तेव्हा पैसे परत मिळतील असे सांगितले. त्यावेळी फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले.

पान १ वरुन



## कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून चिपळे, बोनशेत येथे विकासकामे

माजी ग्रामपंचायत सदस्य कान्हा फडके, दीपक फडके यांच्यासह हौशिराम फडके, तुकाराम धाऊ पाटील, विठ्ठल पाटील, विष्णू पाटील, मनोहर पाटील, संतोष पाटील, हरिश्चंद्र म्हात्रे, सुभाष पाटील, एकनाथ पाटील, भरत पाटील, सुनील फडके, समीर दिनकर पाटील, विशाल पाटील, ॲड. रोहित पाटील, समीर पद्माकर पाटील, ज्ञानेश्वर भगत, हभप विनोद पाटील, गणेश फडके, अनंता फडके, ॲड. सतीश फडके, दिनकर पाटील, शत्रुघ्न पाटील, शरद म्हसकर, जगदीश पाटील, विजय पाटील, अक्षय पाटील, प्रतीक फडके, संजय पाटील, प्रसाद पाटील, धीरज म्हात्रे, सतेज म्हात्रे, प्रणिल फडके, अजित म्हात्रे, सौरभ पाटील, समीर पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## पुरस्कारप्राप्त महिलांचे कार्य इतरांना स्फूर्तिदायक -लोकनेते रामशेठ ठाकूर

या वेळी समाजसेवा क्षेत्रात भारती भैरू पवार, औद्योगिक क्षेत्रात जयश्री काटकर, महिला वैमानिक प्राप्ती ठाकूर, अविरत सेवा मनीषा अतुल पाटील, राजश्री बाळाराम पाटील, शैक्षणिक क्षेत्रात जोत्स्ना सुधीर ठाकूर, बँकिंग सोनल यशोधन पाटील, सिडको प्रशासन क्षेत्रात प्रिया उत्तम रातांबे, राजकीय धुतूमच्या सरपंच सुचित्रा प्रेमनाथ ठाकूर, म्हातवलीच्या सरपंच रंजना चारुदत्त पाटील, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रात तरन्नुम कामजी, शैक्षणिक क्षेत्रात श्रृष्टी राजेंद्र मुंबईकर आणि विशेष सन्मान म्हणून उद्योजिका सोनाली मयुरेश घरत-चौधरी यांना यमुना स्त्री सन्मान पुरस्कार लोकनेते रामशेठ ठाकूर व इतर मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमात यमुना सामजिक शैक्षणिक संस्थेच्या वतीने शांतीवन कुष्ठरोग निवारण समितीला पाच लाख, सिटीझन एज्युकेशन सोसायटीला एक लाख ५१ हजार, रयत शिक्षण संस्थेला एक लाख, ग्राम स्वराज्य समितीला ५१ हजार, किरीट पाटील यांना उरण गणेश नगरमध्ये बंगला, लक्ष्मण जडर यांना कर्जत कासेवाडी येथे घर, आनंद ठाकूर यांना उलवे रिद्धीसिद्धी हाईटमध्ये टू बीएचके फ्लॅट, लक्ष्मण ठाकूर यांना फोटो स्टुडीओ आणि रिद्धीसिद्धी हाईटमध्ये वन बीएचके फ्लॅटचे हस्तांतरण करण्यात आले.

या वेळी उपस्थित मान्यवरांनी स्व. यमुनाबाई तुकाराम घरत यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

## तळोजा पापडीपाडा येथील मदार कॉलनीला २५ वर्षांनंतर पाणीपुरवठा सुरू

माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी दोन वेळा तेथे भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांना पाण्याचा प्रश्न सोडविण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार आठ दिवसांपूर्वी या भागात नळाचे पाणी सुरू झाले. त्यामुळे आनंदित झालेल्या येथील नागरिकांनी आमदार प्रशांत ठाकूर व माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांचे आभार मानले आहेत.

## कोकण विभागीय लोकशाही दिनी पाच अर्ज निकाली

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोंकण विभागीय लोकशाही दिन कोकण भवनमध्ये उपायुक्त (सामान्य प्रशासन) अमोल यादव यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयाकडे पाठविण्यात आली.

यावेळी विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोंकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या १२ असून आज आलेल्या अर्जांची संख्या चार असे एकूण प्राप्त अर्ज १६ होते. त्यापैकी पाच अर्ज निकाली काढण्यात आला.


**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक १५८/२०२३-२०२४ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | अतिरिक्त महाड औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती... पावसाळा पूर्व व पावसाळ्यानंतरची कामे... अतिरिक्त महाड औद्योगिक क्षेत्रातील रस्त्याच्या कडेला गटार साफ करणे, मोऱ्यांचे काम करणे, पावसाळी नाली (रेनकट)करणे व रस्त्याच्या कडेला असलेला राडारोडा हटवणे. | ₹ १५,०६,९४९.०० |
| २ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... रोहा औद्योगिक क्षेत्रात फ्लो मीटरचा पुरवठा करून बसविणे व बूस्टर पंपाचे स्थान बदलून पुन्हा स्थापित करणे. | ₹ १२,१४,८९७.०० |
| ३ | महाड औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती... पावसाळा पूर्व व पावसाळ्यानंतरची कामे... महाड औद्योगिक क्षेत्रातील रस्त्याच्या कडेला गटार साफ करणे, मोऱ्यांचे काम करणे, पावसाळी नाली (रेनकट)करणे व रस्त्याच्या कडेला असलेला राडारोडा हटवणे. | ₹ २२,१८,३८६.०० |
| ४ | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजना, निवासी इमारत आणि अनिवासी इमारतीची देखभाल व दुरूस्ती... महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा कर्मचारी वसाहत, नांगलवाडी कर्मचारी वसाहत व एचएसआर टाकीच्या परिसराची साफसफाई व देखभाल करणे. | ₹ २७,२३,४७२.०० |
| ५ | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील देखभाल व दुरूस्ती... मान्सूनपूर्व व पावसाळ्या दरम्यानची कामे करणे.. पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्याच्या कडेला बांधलेले गटर, मोऱ्यां व उघड्या खोदलेली गटारे इत्यादींची साफसफाई करणे. | ₹ ३९,९८,३५८.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १२/०३/२०२४ ते दिनांक १९/०३/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १४/०३/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १५/०३/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेलमध्ये विविध विकासकामे -अनिल भगत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नागरिकांना अपेक्षीत असलेली विकासाची कामे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली होत असल्याचे प्रतिपादन भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत यांनी प्राथमिक शाळेच्या बांधकामाच्या भूमिपूजनावेळी केले. या कामाचे भूमिपूजन माजी उपमहापौर चारुशीला घरत यांच्या सोमवारी (दि. ११) हस्ते झाले.

भारतीय जनता पक्षाचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पनवेल महापलिकेच्या वतीने



भिंगारी येथील प्राथमिक शाळेचे वाठीव बांधकाम करण्यात येणार आहे. हे काम ५६ लाख पाच हजार २४० रुपयांचा निधी वापरून करण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर चारुशीला घरत यांच्या हस्ते झाले.

या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेवक अजय बहिरा, प्रभाकर बहिरा, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, बी.आर. परदेशी, काशिनाथ परदेशी, किसान मोर्चा अध्यक्ष रुपेश परदेशी, जगदीश परदेशी, किरण मढवी, सुरज परदेशी, शंकर म्हात्रे, सचिन चिखलेकर, अभी लाड, सुनील मढवी, पंकज डावलेकर यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# पनवेलच्या भगत चाळीत शौचालयाचे लोकार्पण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल रेल्वे स्टेशन रोडवरील भगत चाळीमध्ये पनवेल महापालिका स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत माजी नगरसेवक अॅड. प्रकाश बिनेदार यांच्या सौजन्याने शौचालय बांधण्यात आले असून त्याचे लोकार्पण अॅड. प्रकाश बिनेदार यांच्या हस्ते सोमवारी (दि. ११) झाले.

या वेळी माजी उपमहापौर चारुशीला घरत, प्रभाग समिती 'ड'च्या माजी सभापती माजी नगरसेविका सुशीला घरत, माजी नगरसेवक अॅड. मनोज भुजबळ, अजय बहिरा, तेजस कांडपीळे, माजी नगरसेविका अॅड. वृषाली वाघमारे, भाजप अनुसूचित जाती मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष श्याम साळवी, संजय जाधव, भाजप अनुसूचित जाती मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष रावसाहेब खरात, भाजप उत्तर रायगड जिल्हा झोपडपट्टी सेल संयोजक राहुल वाहुळकर, बाळा जाधव, जरीना शेख, अशोक आंबेकर, आनंद जाधव, अमोल लहाने, बाळा जाधव, अनिल साळवी, राजू झिरे, विनोद बोदडे, विजय झिरे, हिरा आत्रम, गोपाल पट्ठे, गणेश जाधव, उमेश कांबळे,सागर जाधव, अनिकेत खरात, सनी साळवे, अजय पवार, जरीना शेख, कविता गुप्ता, सोनाली महाडिक, सुनिता सकपाळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

# पनवेलच्या फडके नाट्यगृहासमोर महापालिकेतर्फे पार्किंग उपलब्ध



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील आद्य कांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहासमोरील भुखंडावर महापालिकेच्या वतीने पार्किंग विकसीत करण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत यांच्या हस्ते सोमवारी (दि. ११) झाले.

महापालिकेच्या माध्यमातून शहरातील प्रॉपर्टी क्रमांक १५६८,१५७२ या ठिकाणी ९७ लाख ७७ हजार ४९७ रुपयांच्या निधीमधून पार्किंग विकसीत करण्यात येणार आहे. या कामामुळे पनवेल शहरात होणारी वाहतुक कोंडीला आळा बसणार आहे. भूमिपूजनावेळी पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक राजू सोनी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, केदार भगत, युवा मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष सुमीत झुंझारराव, प्रशांत खानावकर, तुषार कापरे, महिला मोर्चाच्या सपना पाटील आदी उपस्थित होते.

## निवडक

### कारच्या धडकेत एकाचा मृत्यू

**पनवेल :** एक्स्प्रेस हायवेवर पादचाऱ्यांना जाण्यास मनाई असतानासुद्धा ४५ वर्षीय दत्ता वाघे हा आदई जवळील पुणे-मुंबई एक्सप्रेस हायवे क्रॉस करत असताना कारची ठोकर लागून त्याचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. बलराम सोनेवाने हे पुणे येथून घरी जाण्यासाठी पुणे मुंबई एक्सप्रेस हायवेने घरी जाण्यासाठी निघाले. ते पुणे मुंबई एक्सप्रेस हायवे वरील आदई गावच्या हद्दीत ब्रिजवर आले असता रात्री साडेसातच्या सुमारास हायवेवर परवानगी नसतानादेखील एक इसम कार समोर अचानक आला. त्याला कारची ठोकर लागल्याने तो खाली पडला. या अपघातात त्याच्या डोक्याला आणि शरीराला ठिकठिकाणी गंभीर व दुखापती झाल्या त्याला उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे दाखल करण्यात आले. या वेळी डॉक्टरांनी दत्ता शिरू वाघे याला मृत घोषित केले.

### अपघातात तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** अंगावरुन वाहनाचे चाक गेल्याने २६ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात डंपरचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. जीवादन महतो हा डंपर (एम एच ४६ बीबी ७९३०)वरील चालकाकडून त्याच्या ताब्यातील वाहनाचे चाक रणजीत कुमार यांच्या अंगावरून गेले. यात त्याचा मृत्यू झाला त्यानंतर डंपरवरील चालक अपघात करून पळून गेला.

### दापोली-पारगावमधील व्यक्ती बेपत्ता

**पनवेल :** दापोली पारगांव येथील ४७ वर्षीय व्यक्ती



२ मार्च रोजी सकाळी घरातून भाजी आणायला जातो असे सांगून बाहेर पडले ते अद्याप घरीच आले नाहीत. त्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांनी ते हरविल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. बेपत्ता व्यक्तीचे नाव जितेंद्र मधुकर खैरे असे असून रंग गोरा, उंची पाच फूट पाच इंच, बांधा मध्यम, चेहरा गोल, केस काळे-पांढरे आहे. त्यांनी अंगात ऑरेंज शर्ट व चॉकलेटी पॅन्टी घातली आहे. त्यांना मराठी, हिंदी भाषा बोलता येते. अशा वर्णनाची व्यक्ती कोणाला दिसल्यास त्यांनी ८२८६४१८९६९ अथवा ८४५१०८०८२० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ओमकार शेडगेची नॅशनल इंटिग्रेटेड कॅम्पमध्ये निवड

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थी ओमकार शेडगे याची हरियाणा येथे मुंबई विद्यापीठा अंतर्गत आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या नॅशनल इंटिग्रेटेड कॅम्पमध्ये निवड झाली आहे.



हे शिबिर हरियाणातील फतेहाबाद येथे होणार असून येणारे तीन दिवस हे शिबिर चालणार आहे व या शिबिरामध्ये महाराष्ट्रातील व इतर राज्यातील विविध महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांची निवड झाली असून त्यातील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील ओमकार शेडगे हा मुंबई विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहे.

या राष्ट्रीय सेवा योजनेच्या राष्ट्रीय शिबिरामध्ये देशातील विविध राज्यातील विद्यार्थी त्यांच्या संस्कृतीचे प्रदर्शन करणार आहेत त्यामध्ये रुढी, परंपरा, वेगवेगळे उत्सव, भाषा तसेच सांस्कृतिक कार्यक्रम यांचा समावेश आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी त्याचे अभिनंदन केले व शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या. राष्ट्रीय सेवा योजना विभागातील प्रा. प्रथमेश ठाकूर, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. राहुल कांबळे, प्रा. राजश्री म्हात्रे प्रा. करिष्मा कडव, प्रा. प्रतीक्षा पाटील या सर्वांचे त्याला या शिबिरासाठी मार्गदर्शन लाभले व त्यांनी शुभेच्छा दिल्या.



संपादकीय

# विरोधकांची खोटारडी ओरड

**लोकसभा निवडणुकीपूर्वी नागरिकत्व सुधारणा कायद्याची (सीएए)अधिसूचना जारी केली जाईल अशी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी गेल्या महिन्यातच केली होती. सीएए हा देशाचा कायदा असून त्याची अंमलबजावणी होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही असेही शाह यांनी यापूर्वी अनेकदा ठणकावून सांगितले होते. काँग्रेस पक्ष, तृणमूल काँग्रेस पक्ष अशा काही विरोधकांनी या कायद्याविरुद्ध मुस्लिमांना भडकवण्याचा प्रयत्न चालविला, परंतु आता हा कायदा लागू झाल्यानंतर विरोधकांची ही ओरड किती खोटारडी होती ते स्पष्ट होईलच.**

येत्या काही दिवसांत आगामी लोकसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर होऊ शकतात तसेच आचारसंहिता लागू होऊ शकते. या साऱ्याच्या तोंडावरच केंद्र सरकारने देशात नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या (सीएए) नियमांची अधिसूचना सोमवारी संध्याकाळी जारी केली. या कायद्यामुळे बांगलादेश, पाकिस्तान आणि अफगाणिस्तान या मुस्लिम बहुसंख्य देशांमधील धार्मिक छळ झालेल्या बिगर-मुस्लिम स्थलांतरितांना भारताचे नागरिकत्व मिळू शकणार आहे. या कायद्यामुळे मुस्लिमांविरोधात हेतुपुरस्सर भेदभाव केला जाणार असल्याची ओरड काही विरोधी पक्षांनी बराच काळ चालवली आहे, परंतु प्रत्यक्षात, आगामी निवडणुकांमध्ये हा प्रचाराच्या मुद्यांपैकी एक मुद्दा ठरू शकतो व या कायद्याच्या अंमलबजावणीचा भारतीय जनता पक्षाला निवडणुकीत लाभ होऊ शकतो हे खरे तर या विरोधी पक्षांचे दुखणे आहे. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत आणि पश्चिम बंगालमधील २०२१च्या विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपने या संदर्भात तृणमूल काँग्रेसला लक्ष्य केले होते. आता लोकसभा निवडणुकांपूर्वी हा कायदा लागू करणे हा भाजपचा मास्टरस्ट्रोक मानला जात आहे. सरकारने या कायद्यांतर्गत जारी केलेल्या नियमांनुसार ३१ डिसेंबर २०१४पर्यंत बांगलादेश, पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधून भारतात आलेल्या तेथील गैरमुस्लिम अल्पसंख्याकांना म्हणजेच हिंदू, शीख, ख्रिश्चन, जैन, बौद्ध आणि पारशी समुदायाच्या लोकांना भारतीय नागरिकत्व मिळू शकणार आहे. नागरिकत्व सुधारणा कायदा डिसेंबर २०१९मध्ये संसदेत मंजूर झाला होता आणि त्यानंतर त्याला राष्ट्रपतींची संमतीदेखील मिळाली. देशाच्या काही भागांमध्ये या कायद्याविरोधात निदर्शने झाल्यामुळे सरकारने त्याच्या अंमलबजावणीबाबत सबुरीचे धोरण ठेवले होते. हा कायदा मंजूर होण्याच्या बरेच आधीपासून त्या विरोधात विरोधकांचा गदारोळ सुरू होता. या विधेयकातून मुस्लिमांना वगळल्यामुळे काँग्रेस पक्षाने कायमच त्याला विरोध केला आहे. सीएए मंजूर झाल्यास बांगलादेशातून आलेल्या स्थलांतरित हिंदूंची संख्या वाढेल आणि ईशान्येकडील राज्यांमधील स्थानिकांची संख्या कमी होईल व तेथील मूळ स्थानिकांच्या संस्कृतीला फटका बसेल अशी भीतीही व्यक्त केली जाते आहे. काँग्रेससारख्या विरोधी पक्षांनी या भीतीला खतपाणी घातले आहे, परंतु या कायद्यामुळे कुणाचेही नागरिकत्व हिरावून घेतले जाणार नाही हे मोदी सरकारकडून वेळोवेळी स्पष्ट करण्यात आले आहे. शेजारच्या मुस्लिमबहुल राष्ट्रांमधून गेल्या ७० वर्षांत अनेक लोक भारतात येऊन शरणार्थी म्हणून राहात आहेत. इतकी वर्षे येथे राहूनही आपल्याला भारताचे नागरिकत्व मिळालेले नाही याचे दु:ख या लोकांच्या मनात आहे. ७० वर्षांचा प्रदीर्घ काळ त्यांनी या देशात बेकायदा वास्तव्याच्या स्वरूपात काढला आहे. त्यांच्यासाठी नागरिकत्व सुधारणा कायदा असून देशातील मुस्लिमांना अकारण या कायद्याविरोधात भडकवले जाते आहे. आता या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाल्यावरच विरोधकांचा हा कांगावा किती खोटारडा होता हे स्पष्ट होऊ शकेल.

# मुंबईकरांचा प्रवास सुखकर करणारा सागरी किनारा मार्ग





आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मुंबई शहरातील धकाधकीच्या जीवनात वेळ आणि इंधन बचतीला आत्यंतिक महत्त्व आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने उभारण्यात येत असलेल्या सागरी किनारा मार्ग (दक्षिण)ची एक बाजू वाहतुकीसाठी खुली होत असून वेळ आणि इंधन बचतीबरोबरच वाहतूक कोंडी आणि प्रदूषण कमी होऊन मुंबईकरांचा प्रवास सुखकर करण्यामध्ये हा मार्ग महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे.

देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळख असलेले मुंबई हे भारतातील आंतरराष्ट्रीय दर्जाचे एक प्रमुख शहर आहे. दक्षिण मुंबईतील परिसर व्यापार उदिमाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानला जातो. सात बेटांनी तयार झालेल्या मुंबईचा भौगोलिक विस्तार उत्तर दक्षिण असा पसरलेला असल्याने येथील देशाच्या मुख्य भागाशी जोडलेले दोन मुख्य रस्ते देखील उत्तर दक्षिण असेच बांधलेले होते. साहजिकच या रस्त्यांवर वाहतूक कोंडी ही नित्याची बाब असे. तथापि, मागील काही वर्षांत या रस्त्यांना पूरक असे नवीन रस्ते तयार होत असल्याने रहदारीची ही जटील समस्या कमी होऊ लागली आहे. नुकत्याच सुरू झालेल्या 'अटल सेतू'नंतर आता सोमवारी वाहतुकीसाठी खुला होत असलेला मुंबई किनारी रस्ता प्रकल्प (दक्षिण) यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

**प्रकल्पामुळे होणारे फायदे**

सागरी किनारी रस्त्यामुळे अंदाजे ७० टक्के वेळेची बचत होणार असून इंधनामध्ये ३४ टक्के बचत होईल. इंधन बचतीमुळे प्रती वर्षी विदेशी चलनाची देखील मोठ्या प्रमाणात बचत होईल. ध्वनी आणि वायू प्रदूषण कमी होईल. सुमारे ७० हेक्टर हरितक्षेत्र निर्मितीमुळे प्रदूषण कमी होण्यास मदत होऊन मुंबईकरांचे जीवनमान सुधारेल. या हरितक्षेत्रात सायकल ट्रॅक, सार्वजनिक उद्याने, जॉगिंग ट्रॅक, खुले प्रेक्षागृह आदी प्रस्तावित आहेत. या रस्त्यामुळे इतर मार्गावरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल आणि सुरक्षित व जलद प्रवास करता येईल. मुंबईकरांना सागर किनारी अतिरिक्त प्रोमीनेड उपलब्ध होईल.

**प्रकल्पाची वैशिष्ट्ये**

मुंबई किनारी रस्ता प्रकल्प (दक्षिण) हा दक्षिण मुंबईतील प्रिन्सेस स्ट्रीट फ्लायओव्हर ते वांद्रे वरळी सी लिंकच्या वरळी टोकापर्यंत असणार आहे. या रस्त्याची लांबी १०.५८ किमी असून मार्गिकांची रस्त्यावरील संख्या दोन्ही बाजूला प्रत्येकी चार असेल. तर बोगद्यांमध्ये ती दोन्ही बाजूला प्रत्येकी तीन असेल. भराव टाकून बनविलेल्या रस्त्यांची लांबी ४.३५ किमी असून पुलांची एकूण लांबी २.१९ किमी आहे. या मार्गातील मलबार हिल टेकडीच्या खालील दुहेरी बोगद्यांची लांबी प्रत्येकी २.०७२ कि.मी. असून त्याचा अंतर्गत व्यास ११ मीटर आहे. याचे एकूण भरावक्षेत्र १११ हेक्टर इतके असून तीन ठिकाणी आंतरबदल असतील ज्यांची लांबी १५.६६ किमी इतकी आहे. ७.५ किमी लांबीचे नवीन पदपथ असून बस वाहतूकीसाठी समर्पित मार्गिका ठेवण्यात आली आहे. समुद्री लाटांपासून बचावासाठी ७.४७ किमी लांबीची सागरी तटरक्षक भिंत असणार आहे. या प्रकल्पात अमरसन्स, हाजी अली, वरळी डेअरी, थडाणी जंक्शन, वरळी येथे पार्किंगची सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे.

हा प्रकल्प मे २०२४पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. या प्रकल्पाचे काम प्रगतिपथावर असून २५ फेब्रुवारीपर्यंत याची भौतिक प्रगती ८५.९१ टक्के, तर आर्थिक प्रगती ८१.१९ टक्के इतकी झाली आहे. बोगदा खणन काम १०० टक्के पूर्ण झाले असून पुनःप्रापणाचे (रिक्लेमेशन)चे काम ९८ टक्के पूर्ण झाले आहे. समुद्रभिंत उभारण्याचे कामदेखील पूर्णत्वास आले असून आंतरबदल ८७ टक्के तर पुलांचे काम ८५ टक्के पूर्ण झाले आहे.

**बोगद्याची वैशिष्ट्ये**

किनारा मार्गावरील पहिला बोगदा खणण्याची सुरुवात जानेवारी २०२१मध्ये करण्यात आली होती. हा बोगदा जानेवारी २०२२मध्ये पूर्ण झाला. दुसरा बोगदा खणण्याची सुरुवात एप्रिल २०२२मध्ये करण्यात आली आणि हा बोगदा मे २०२३मध्ये पूर्ण झाला. बोगद्याला ३७५ मिमी जाडीचे काँक्रीटचे अस्तर लावण्यात आलेले असून त्यावर अग्नीप्रतिबंधक उपाययोजनेंतर्गत अग्नीरोधक फायरबोर्ड लावण्यात येत आहेत. भारतात प्रथमच सकार्डो वायुविजन प्रणालीची व्यवस्था करण्यात आली असून आपत्कालिन निर्वासनासाठी प्रत्येक ३०० मीटरवर छेद बोगदे आहेत. उपयोगिता सेवेसाठी बोगद्यांमध्ये युटीलिटी बॉक्सची व्यवस्था करण्यात आली आहे. दुहेरी बोगद्यासाठी अद्ययावत वाहतूक व्यवस्थापन नियंत्रण प्रणालीची व्यवस्था करण्यात येत आहे.

**प्रकल्पाचा खर्च**

मुंबई किनारी रस्त्यासाठी एकूण बांधकाम खर्च १३९८३.८३ कोटी रुपये अपेक्षित आहे. यामध्ये ९३८३.७४ कोटी रुपयांच्या प्रत्यक्ष बांधकाम खर्चाबरोबरच इतर अनुषंगिक खर्चाचा समावेश आहे.

**इतर वैशिष्ट्ये**

सागरी रस्ता प्रकल्पातील बोगदा खणणाऱ्या यंत्राने (टीबीएम) खोदण्यात येणारा भारतातील सर्वात मोठ्या व्यासाचा बोगदा (व्यास १२.१९ मी.) आहे. भारतात प्रथमच रस्ते वाहतूक बोगद्यामध्ये सकार्डो वायुविजन प्रणालीची योजना करण्यात आली आहे. तसेच भारतामध्ये प्रथमच एकलस्तंभ पाईलचा पाया बांधून पुलांची उभारणी करण्यात आली आहे. एकाच प्रकल्पामध्ये पुनःप्रापण करुन रस्ता, पूल, उन्नत मार्ग, उतरण मार्ग, आच्छादित बोगदा, समुद्र तसेच टेकडीखालून बोगदा, हरितक्षेत्राची निर्मिती करण्यात आली आहे. प्रकल्पातील प्रवाळांचे (कोरल) स्थलांतर व अस्तित्व टिकविण्याचे काम यशस्वीरित्या साध्य करण्यात आले आहे.


एकूणच वेळ आणि इंधन बचतीबरोबरच वाहतूक कोंडी आणि प्रदूषण कमी करून मुंबईकरांचे दैनंदिन जीवनमान सुखकर करण्यामध्ये हा किनारा मार्ग महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, हे निश्चित.

**-ब्रिजकिशोर झंवर,**
**विभागीय संपर्क अधिकारी**



बदलते तंत्रज्ञान

## ऑनलाईन गुन्ह्यांवर राहणार सरकारची नजर



मोदी सरकारने आता ऑनलाईन गुन्ह्यांविरोधात मोहीम सुरू केली आहे. सेक्स्टॉर्शन, नोकरीचे आमिष, ब्लॅकमेल अशा प्रकारच्या ऑनलाईन गुन्ह्यांची तक्रार नोंदवण्यासाठी टेलिकॉम मंत्रालयाने दोन नवीन प्लॅटफॉर्म लाँच केले आहेत. चक्षु पोर्टल आणि डिजिटल इंटेलिजन्स प्लॅटफॉर्म अशी यांची नावे आहेत.


टेलिकॉममंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबत माहिती दिली. केंद्र सरकारच्या संचार साथी पोर्टलवर हे दोन्ही प्लॅटफॉर्म लाँच करण्यात आले आहेत. तुमच्यासोबत सायबर फसवणूक झाली असेल, तर DIPवर त्याची माहिती द्या, आणि एखाद्या संशयास्पद नंबरवरून कॉल किंवा मेसेज येत असतील, तर त्याबाबत चक्षु पोर्टलवर तुम्ही माहिती देऊ शकता.

व्हॉट्सअ‍ॅप आणि टेक्स्ट मेसेज अशा माध्यमातून कित्येक जणांना दररोज नोकरीचे आमिष किंवा पैसे कमावण्याचे आमिष दिले जाते. कित्येकांना गुगल रिव्ह्यू किंवा क्रिप्टोच्या माध्यमातून पैसे कमावण्याची संधी असल्याचे मेसेज येतात. तुम्हालाही एखाद्या नंबरवरुन असे मेसेज वा कॉल येत असतील, तर त्याची माहिती चक्षु पोर्टलवर द्यायची आहे. यानंतर त्या नंबरची आणि मेसेजेसची पूर्ण पडताळणी केली जाईल. त्या नंबरपासून धोका असल्यास तो नंबर बंद केला जाईल.

या दोन्ही प्लॅटफॉर्मवर तक्रार करणाऱ्या व्यक्तीची ओळख गुप्त ठेवण्यात येईल. संचार साथी पोर्टलवर देखील ही सुविधा उपलब्ध आहे. सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी हे पोर्टल लाँच करण्यात आले होते. आतापर्यंत या माध्यमातून धोकादायक असे ५९ लाख मोबाईल कनेक्शन बंद करण्यात आले आहेत.

दररोज फसवणुकीची शक्यता असणारे २,५०० कनेक्शन्स कट करण्यात येत आहेत, तसेच फ्रीज केलेली रक्कम फसवणूक झालेल्या व्यक्तींना परत देण्याची व्यवस्था देखील आरबीआय आणि इतर बँकेसोबत मिळून केली जात आहे, असं वैष्णव यांनी स्पष्ट केले.

# अभिनेते, नाट्यनिर्माते चिंतामण कोल्हटकर



निमित्त

चिंतामणराव कोल्हटकर यांचे घराणे नेवरे या रत्नागिरी जिल्ह्यातील गावचे होते. त्यांचा जन्म तेथेच १२ मार्च १८९१ रोजी झाला. त्यांचे वडील हे वर्तमानपत्र लेखक आणि वक्ते होते. चिंतामण कोल्हटकरांच्या वयाच्या सातव्या वर्षीच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. लहानपणी अभ्यासात अधिक गती नसल्याचे पाहून काही वर्षे त्यांनी पिढीजात असलेली शेती केली.

सातारा येथे तुकाराम या नाटकात त्यांनी मंबाजीची भूमिका साकारून (१९०७) रंगभूमीवर प्रवेश केला. नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर याचे बोट धरून ते महाराष्ट्र नाटक मंडळीत आले आणि १९१८मध्ये दीनानाथ मंगेशकर, कृष्णराव कोल्हापुरे यांच्या समवेत स्थापन केलेल्या बळवंत संगीत नाटक मंडळीपर्यंतचा साराच इतिहास मोठा संघर्षमय, रोमांचकारी आणि अद्भुत असाच आहे.

कोल्हटकर इ.स. १९११मध्ये महाराष्ट्र नाटक मंडळीत दाखल झाले आणि पुढच्याच वर्षी ते भरत नाटक मंडळीत गेले. कोल्हटकरांनी भूमिका केलेली पुण्यप्रभाव, राजसंन्यास, भावबंधन, इ. नाटके खूप गाजली. वेड्यांचा बाजार हे राम गणेश गडकरी यांचे अपूर्ण नाटक त्यांनी पूर्ण केले. राम गणेश गडकरी, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, इतिहाससंशोधक वासुदेवशास्त्री खरे, वीर वामनराव जोशी, अशा अनेक नामवंत नाटककारांकडून त्यांनी नाटके लिहून घेतली आणि मोठ्या दिमाखात रंगभूमीवर आणली. चिंतामणराव कोल्हटकर आणि मास्टर दीनानाथ मंगेशकर यांनी आपल्या बळवंत संगीत मंडळीतर्फे उत्तमोत्तम नाट्यकृती सादर केल्या आणि गद्य आणि पद्य यांचा अपूर्व साक्षात्कार रंगभूमीवर घडवला. त्यांची वसंतसेना (इ.स. १९४२) या चित्रपटातली शकाराची भूमिका गाजली.

चिंतामणराव कोल्हटकरांनी बळवंत संगीत मंडळीचे बळवंत पिक्चर्समध्ये रूपांतर केले, पण त्यांना या व्यवसायात प्रचंड खोट बसली. कोर्टकचेऱ्या, नामुष्की आणि पदरी आलेलं प्रचंड अपयश पाहून आणि आपल्याच कंपनीत नोकर म्हणून काम करावे लागण्यासारखी मानहानी झाल्याने ते चित्रपटव्यवसायतून तावून सुलाखून बाहेर पडले आणि परत नाटकाकडे वळले.

चिंतामणरावांनी पुढे त्यांनी गंगाधरपंत लोंढे यांच्या राजाराम संगीत मंडळीत प्रवेश केला आणि परत नाटकांतून कामे करायला सुरुवात केली. पुढे ते मो.ग. रांगणेकरांच्या नाट्यनिकेतनमध्ये गेले. अखेरीस त्यांनी ललित कला कुंज नावाची स्वतःची नाटक मंडळी काढली. या कंपनीनेच पु.ल. देशपांडे यांना उदयास आणले. कोल्हटकरांनी मराठीबरोबरच हिंदी आणि उर्दू नाटकांतही भूमिका केल्या. पुण्यप्रभाव या नाटकातील त्यांच्या भूमिकेबद्दल त्यांचा मुंबईच्या पोलीस आयुक्तांनी सत्कार केला होता. त्यांचे विविधढंगी काम पाहून जवाहरलाल नेहरूंनी त्यांना बहुरूपी म्हणून नावाजले होते. त्यामुळेच चिंतामणरावांनी आपल्या आत्मचरित्राला बहुरूपी हे नाव दिले आहे. त्यांनी लिहिलेल्या माझे नाटककार या पुस्तकात तत्कालीन नाट्यलेखकांच्या व्यक्तिरेखा वर्णिल्या आहेत. त्यांनी लिहिलेले पुण्यावतार हे पाच-अंकी नाटक इ. स. १९६६मध्ये मुंबईच्या आंतरनाट्य या संस्थेने रंगमंचावर आणले होते.

क्लिक...क्लिक...!



पनवेल : वीज निर्मितीसाठी पवनचक्की हा एक उत्तम मार्ग आहे. देवगड समुद्रकिनारी पवनचक्क्यांची रांग दिसून येते.

आरोग्य प्रहर

## सतत थकवा येतोय... फळे देतील संजीवनी



फळे ही आपल्या नियमित आहारातील महत्त्वाचा भाग आहेत, कारण याचे सेवन केल्याने तुमचे शरीर केवळ हेल्दी राहात नाही तर तुमची त्वचा अधिक तरूण दिसते. अनेक आजारांपासूनही तुम्ही दूर राहाता. शरीर हेल्दी आणि निरोगी राखण्यासाठी फळांचे सेवन हे एखाद्या संजीवनीपेक्षा कमी नाही. आपल्या रोजच्या डाएटमध्ये ताज्या फळांचा समावेश करून घेणे हे कायम फायदेशीरच ठरते.

फळांचे सेवन हे पचनक्रिया चांगली करते आणि शरीरामध्ये येणारा थकवा दूर करण्यास मदत करते. ज्या व्यक्तींना लठ्ठपणा आहे अथवा ज्यांना वजन कमी करायचे आहे, त्यांनी फायबरयुक्त फळांचे सेवन केल्यास, त्यांची भूक नियंत्रणात राहून वजन कमी करण्यास मदत मिळते. काय आहेत फळांचे फायदे जाणून घ्या.

रोज फळे खाल्ल्याने वय आणि आरोग्य दोन्ही गोष्टींसाठी फायदा मिळतो. फळांच्या सेवनाने केवळ शरीर नाही तर मेंदूही तल्लख राहातो. रोज फळांच्या सेवनाने तुम्ही ताजेतवाने राहाता आणि फळं हे अतिशय सहज पचन होण्यासारखे डाएट आहे. फळांचे सेवन केल्याने तुमची प्रतिकारशक्ती भक्कम राहाते आणि शरीर निरोगी राहाते. शरीर निरोगी करण्यासाठी ताजी फळं ही संजीवनीप्रमाणे काम करतात. फळांमध्ये शरीराला आवश्यक असे पोषक तत्व असून आवश्यक मिनरल्स, विटामिन्स आणि खनिजे मिळतात. विटामिन सी, पोटॅशियम, फायबर आणि अँटीऑक्सिडंट्स गुणांनी युक्त असणाऱ्या फळांच्या सेवनाने प्रतिकारशक्ती वाढून आजारांपासून बचाव होतो.

फळांचे सेवन केल्याने संक्रमण आणि आजारांशी लढण्यास ताकद मिळते. डाएटिशियनच्या सांगण्यानुसार, रोज आपल्या डाएटमध्ये फळांचे सेवन केल्याने शरीराला आवश्यक पोषक तत्व मिळतात. त्यामुळे रोज किमान एक फळ तरी खावे.

# बोर्ली ग्रामपंचायतीत विकासकामांचे भूमिपूजन

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्याला मध्यवर्ती ठिकाण असलेल्या बोर्ली ग्रामपंचायतीत विविध विकास कामांचे भूमिपूजन नुकतेच झाले.



या वेळी बोर्ली ग्रामपंचायत अंतर्गत जिल्हा नियोजनाच्या पाच लाख रुपये निधीतून अनिल डोंबे ते शिवानी घरापर्यंतचा रस्त्याचे भुमिपुजन, त्यानंतर जिल्हा नियोजनाच्या सात लाख निधीतून स्मशानभूमी रस्त्याचे भूमिपूजन, त्यानंतर जिल्हा नियोजनाच्या चार लाख रुपये निधीतून संदेश शिर्के यांचे घरानजीक साकव कामाचे भूमिपूजन सरपंच सपना जायपाटील व ग्रामस्थ यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले.

या वेळी सरपंच सपना जायपाटील यांचे हस्ते बोर्ली ग्रामपंचायतीचे वतीने शिवसेना शिंदे गट उपजिल्हा प्रमुख भरत बेलोसे, जिल्हा नियोजन समिती सदस्य निलेश घाटवळ, शिवसेना मुरूड उपतालुकाप्रमुख भगिरथ पाटील, विभागप्रमुख भारत मोती आदीचे स्वागत पुष्पगुच्छ प्रदान करून केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन भगिरथ पाटील यांनी केले.

## कोलाड केंद्र शाळेचे अभियानात यश

**रोहे :** महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभिनव उपक्रमातील स्पर्धेत प्राथमिक गटात रोहा तालुक्यातील कोलाड केंद्र शाळेने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. मुख्याध्यापिका श्वेता रिसबुड यांच्या नियोजनातून व शाळेतील शिक्षक, विद्यार्थी यांच्या अथक प्रयत्नातून शाळेने हे यश संपादन केले.

## खालापुरात एकाला जबर मारहाण

**खोपोली : प्रतिनिधी**

बहिणीचे लग्न ठरलेले असतानादेखील तिच्याशी बोलणाऱ्या एकाला जबर मारहाण करण्याची घटना खालापुरातील धामणी येथे घडली आहे. अजय हिलम (रा.कर्जत) यांच्या बहिणीचे लग्न संदेश वाघमारे याचे सोबत ठरले आहे. असे असतानादेखील आकाश बळीराम पवार हा अजयच्या बहिणीशी वारंवार बोलत असे. बहिणीशी यापुढे बोलायचे नाही. नाहीतर तुला धामणी येथे कंपनीचे गेट समोर येवुन मारू अशी धमकी अजय याने आकाशला दिली होती. तरीसुद्धा आकाश ऐकत नसल्याने या रागातून अजय, संदेश साहिल आणि त्यांचे अनोळखी मित्र या चौघांनी रविवारी संध्याकाळी सहा वाजण्याच्या सुमारास धामणे गावाच्या हद्दीत आशापुरा कंपनीचे गेटसमोर आकाशला गाठले. चौघांनी हातामधील दांडक्याने व लोखंडी रॉडने आकाशच्या डोक्यावर व पाठीवर मारहाण केली.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार निलेश कांबळे हे करीत आहेत.

## माणगावातून दोघी बेपत्ता

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील साले गावातील व खरवली गावातील १८ वर्षीय दोन तरुणी राहत्या घरातून बेपत्ता झाल्या आहेत. यामुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे.

साले गावातील तरुणीची फिर्याद राजकुमार मधुकर मोरे यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली. त्यांची भाची सायली समीर तांबे ही साले गावातून निघून गेली आहे ती अद्याप घरी आलेली नाही. बेपत्ता सायली रंगाने गोरी, अंगाने सडपातळ, चेहरा उभा, डोळे काळे, उंची सुमारे पाच फूट, अंगात गुलाबी टॉप, सफेद लेगीज पॅन्ट, पायात गुलाबी सँडल आहे.

तर खरवली गावातील बेपत्ता तरुणीची फिर्याद शांतीसागर विठ्ठल जाधव यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली. त्यांची मुलगी तन्वी शांताराम जाधव ही खरवली गावातून निघून गेली आहे ती अद्याप घरी आलेली नाही. बेपत्ता तन्वी रंगाने गोरी, अंगाने मध्यम, चेहरा गोल, डोळे काळे, उंची सुमारे पाच फूट, अंगात लाल टीशर्ट, निळी जीन्स, पायात सफेद रंगाचे बूट आहे.

दोन्ही तरुणी कोणाला आढळल्यास पोलीस हवालदार सानप (९६३७२८६३७८) यांच्याकडे संपर्क साधण्याचे आवाहन माणगाव पोलीस ठाण्यातर्फे करण्यात आले आहे.

---

**पनवेल महानगरपालिका**
शहर अभियंता विभाग
दरपत्रक

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.२०५/२०५/२०२४

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता अंदाजपत्रक तयार करण्यासाठी खालील कामासाठी दरपत्रक (Market Rate) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील खारघर येथील सेक्टर-१२, भुखंड क्र. F४३ A वर नव्याने दैनिक बाजार उभारणे. | १२/०३/२०२४ ते १८/०३/२०२४ (०७ दिवस) |
| २ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील कामोठे येथील सेक्टर-१७, भुखंड क्र.२६ वर नव्याने मच्छी मार्केट बांधणे. | |
| ३ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील पनवेल येथील सेक्टर-२ ई, भूखंड क्र. ३५ अ / २ वर नव्याने मच्छी मार्केट उभारणे. | |
| ४ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील कळंबोली येथील सेक्टर-१५, भुखंड क्र.४३ अ वर नव्याने मच्छी मार्केट उभारणे. | |

या कामाच्या दरपत्रकाबाबतची माहिती पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दि.१२/०३ /२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. सदर बाबींचे बाजार भाव स्वत:च्या लेटरहेडवर महानगरपालिका कार्यालयात अथवा pmbandhkamdept01@gmail.com या ई-मेलवर मुदतीत पाठविण्यात यावे ही विनंती. सदर दर हे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी आहेत. याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : ११/०३/२०२४

सही/-
**(डॉ. प्रशांत रसाळ)**
अतिरिक्त आयुक्त-।
पनवेल महानगरपालिका

---

**TENDER NOTICE REDEVELOPMENT**

Sealed Tenders are invited from reputed & capable Developers / Builders for redevelopment of

**EVEREST CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD**

(Regd. No. RGD/PWL/HSG/(TC)/1622/2001-2002)
Bldg No. SP-1, (A & B Wing), Sainagar, Near 52 Bunglow, Panvel, Dist. Raigad - 410206

**AREA OF PLOT: 998 SQ. MTR.**
**NO. OF MEMBERS : 36**

**This Society is holding all the powers for Redevelopment**

**Tender Documents are available at :**
B-12, Everest Co-Op Housing Society Ltd., SP-1, Sainagar, Near 52 Bunglow, Panvel, Dist. Raigad - 410206, Contact No : 8898115205

**Cost Of Tender Form : Rs. 5000/- (Non Refundable)**

By Pay Order / D.D. Only Payable at Panvel in the name of Everest Chs

Date Of Issue Of Tender Document : 12/03/2024
Last Date Of Submission : 01/04/2024
Timing : 10:00 am to 5:00 pm

DATE 11/03/2024 Sd/- Chairman Sd/- Treasurer Sd/- Secretary
For EVEREST CO-OP. HSG. SOCIETY LTD.

---

**Tender Notice**

Tenders are invited from reputed contractors for structural repairs and painting work of BLDG. A-03, of KV (2) CHS LTD., Sec 11, Kharghar.

**Tender cost: 2000/- (Non-refundable).**

**Tender issue from 12.03. 2024.**

LAST DATE FOR SUBMISSION OF OFFER 19.03.2024 at society office of KV (2) CHS LTD.

**Tender sale address:**

Shree swami Krupa chs, Dokali,kolshet ,Thane.
Mob no. 9867282679

---

अर्जदारांचे वकील ॲड. नित्यानंद राम ठाकूर
मु. कोपर, पो. गव्हाण, ता. पनवेल जि. रायगड.
मा. विकास द. बडे सो,

**जाहीर नोटीस**

**उरण येथील मे. दिवाणी न्यायाधीश क./व. स्तर साहेब यांचे न्यायालयात**

दिवाणी चौकशी अर्ज नं.  /२०२४
ने. ता १५/०४/२०२४
नि.८/ड

१. श्री. नामदेव वासु उर्फ वासुदेव कोळी
वय : ५४ वर्षे, व्यवसाय : नोकरी,
रा. हनुमान कोळीवाडा, ता. उरण,
जि. रायगड. पिन नं. ४००७०४ .
२. श्री. विशाल महादेव कोळी
वय : ३७ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा. महादेव कोळी, हनुमान कोळीवाडा,
ता. उरण, जि. रायगड. पिन नं. ४००७०४.
३. सौ. विदया पंकज कोळी उर्फ विदया महादेव कोळी
वय : ३२ वर्षे, व्यवसाय : गृहीणी
रा. उरण कोळीवाडा,
ता. उरण, जि. रायगड. पिन नं. ४००७०४.
४. श्रीमती वत्सला महादेव कोळी
वय : ५७ वर्षे, व्यवसाय : गृहीणी,
रा. महादेवा कोळी, ९४२, हनुमान कोळीवाडा,
ता. उरण, जि. रायगड. पिन नं. ४००७०४.
५ . सौ. लक्ष्मी यशवंत कोळी उर्फ
लक्ष्मी वासु उर्फ वासुदेव कोळी
वय : ५५ वर्षे, व्यवसाय गृहीणी
रा. मु. गव्हाण, पो. गव्हाण,
ता. पनवेल, जि. रायगड. पिन नं. ४१०२०६. ............ **अर्जदार**
विरूध्द
कोणीही नाही .............................................. **सामनेवाले**

सर्व लोकांना या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की सदरहु अर्जदार वारस दाखला मिळण्यासाठी मे. कोर्टात अर्ज दाखल करत आहेत **कै. वासुदेव उर्फ वासु विठठल कोळी,** मौजे मु. हनुमान कोळीवाडा, ता. उरण, जि. रायगड. याचे नैसर्गीकरित्या वृधापकाळाने राहत्या घरी येथे दिनांक २०/०९/१९९२ रोजी निधन झाले आहे. अर्जदार हे कै. वासुदेव उर्फ वासु विठ्ठल कोळी यांचे वारस आहेत.

मयत **कै. वासुदेव उर्फ वासु विठ्ठल कोळी** यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन युनिट केस नंबर १७६ मु. शेवा, ता. उरण, जि.रायगड

| अ.क्र. | मौजे | स.नं./हि.नं. | क्षेत्रफळ ए.जि.ए. | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | शेवे | १४४/३ क | ०-१०-०<br>०-०२-०<br>०-१२-० | ०=२२ |

मिळकतीचे वर्णन युनिट केस नं.४७८ मु.शेवा, ता. उरण,जि.रायगड

| नं. | मौजे | मिळकत नं. | घर नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| १ | शेवे | ४७८ | ४० अ | १०६ |

मौजे शेवे येथील वर वर्णन केलेल्या शेतजमिनीच्या मिळकती सिडकोतर्फे संपादित झालेल्या आहेत. सबब मिळकतीबाबत **कै. वासुदेव उर्फ वासु विठठल कोळी** यांचे कायदेशिर वारस असल्याचा दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर वारस दाखल्याच्या कामी कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत मे. कोर्टात दाखल करावयात मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारसदाखला दिला जाईल यांची नोंद घ्यावी.

आता ०७/०३/२०२४ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिला.

सही/- **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, उरण — (कोर्टाचा शिक्का) — सही/- **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, उरण

---

**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**ऑनलाईन निविदा सूचना क्रमांक १८५ सन २०२३-२४** (द्वितीय सूचना)

कार्यकारी अभियंता, महाड (सा. बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन- ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे (क) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा. बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील मांदाड तळा इंदापुर निजामपुर महाड विसापुर दापोली रस्ता रामा ९७ किमी. ९२/२०० मधील दादली पुलाचे बांधकाम करणे. (द्वितीय सूचना) | १३४२३६३५५/- | ६,७२,०००/- | ३५४०/- | १८ महिने | आवश्यकता नाही |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **०५/०३/२०२४** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **१२/०३/२०२४** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | निविदापूर्व बैठक | मा.अधीक्षक अभियंता (सा.बां.) प्रादेशिक विभाग, कोकण फोर्ट, यांचे कार्यालयात दिनांक **०६/०३/२०२४ वेळ १५.०० वाजता** |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, रायगड सा.बां. मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **१३/०३/२०२४** वेळ **१२.०० वाजता** |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/१५४९**
**दिनांक : ०४/०३/२०२४**

सही/
**(महेश. रा. नामदे)**
कार्यकारी अभियंता
महाड (सा.बां.) विभाग, महाड

---

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E –TENDER NOTICE (SECOND CALL)**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/ Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/Tech/ E-Tender-01/2024-25 Dtd.02.03.2024 RFX No. 7000030316 | **Sub:-Second Call** for providing 01 No. Outsourced Steno (Skilled), 01 No. outsourced Typist (Skilled), 3 no. of outsourced LDC F&A/HR (Skilled) & 04 nos. of outsourced Peon (unskilled) at EHV (O&M) Dn. Mahad under EHV (O&M) Dn. Mahad for the year 2024-25. | **Rs. 2529894.24 /-** (Including GST) |

EMD will be the 1% of the **estimated cost** or Rs. 25,299/-whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST.

Bid submission is from 12.03.2024 @ 00:00 hrs to 18.03.2024 @23:59Hrs for above tender for further details visit our website:-https://srmetender.mahatransco.in

**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

Note:All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**~Sd~**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad.**

---

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000030518** **Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-5/ 2024-2025** RFx E-tender for Hiring of LMV vehicle for EHV Lines Sub-Division Panvel-2 under EHV O&M Division Panvel for period 01.04.2024 to 31.03.2025. **Tender amount - Rs. 5,99,928/- , Tender Fee Rs. 500/- + 18% GST** EMD 1% of estimated cost for each Tender |
| 2 | Online Downloading the RFx | **11.03.2024, 18:00 Hrs to 18.03.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 18.03.2024, 23:59 Hrs** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **19.03.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.

**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER EHV (O&M) DN. PANVEL**

---

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000030512** **Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-4/ 2024-2025** RFx E-tender for Hiring of vehicle at 100kV Patalganga&Bhokarpada Substation under EHV O&M Division Panvel for period 01.04.2024 to 31.03.2025. **Tender amount - Rs. 5,96,904/- , Tender Fee Rs. 500/- + 18% GST** EMD 1% of estimated cost for each Tender. |
| 2 | Online Downloading the RFx | **11.03.2024, 18:00 Hrs to 18.03.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 18.03.2024, 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **19.03.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.

**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER EHV (O&M) DN. PANVEL**

---

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification.

| RFX | Description | *Esti. Cost* |
|---|---|---|
| Tender -2 **(RFX.7000030490)** | RFx E-tender for Hiring of vehicle at 100kV Thal Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2024 to 31.03.2025. **(Tender Fee Rs. 500/- + 18% GST)** | **Rs.5,96,904/-** |
| Tender -3 **(RFX.7000030514)** | RFx E-tender for Hiring of MMV vehicle at EHV Substation Maint Sub DnApta under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2024 to 31.03.2025. **(Tender Fee Rs. 500/- + 18% GST.)** | **Rs.5,99,904/-** |
| Tender-6 **(RFX.7000030530)** | RFx E-tender for Hiring of vehicle at EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2024 to 31.03.2025. **Tender Fee Rs. 500/- + 18% GST.** | **Rs.5,99,928/-** |
| Tender-7 **(RFX.7000030503)** | RFx E-tender for Hiring of vehicle at 100kV Taloja Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2024 to 31.03.2025. **(Tender Fee Rs. 500/- + 18% GST)** | **Rs.5,96,904/-** |
| Tender-8 **(RFX.7000030498)** | RFx E-tender for Hiring of vehicle at 220kV Uran Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2024 to 31.03.2025. **(Tender Fee Rs. 500/- + 18% GST)** | **Rs.5,96,904/-** |

EMD 1% of estimated cost for each Tender. **Submission of bids from 11.03.2024 to 18.03.2024 up to 23:59 hrs, Opening date:-19.03.2024 @ 11:00 Hrs.** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/Contact Person: The ADDL. Executive Engineer (O) Tel No. 022-27465410, Mob. No. 8530095666 E-mail ID ee7210@mahatransco.in

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER, EHV(O&M) DN PANVEL.**

---

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification.

| RFX | Description | *Esti. Cost* |
|---|---|---|
| Tender -9 **(RFX.7000030508)** | RFx E-tender for Hiring of vehicle at 220kV Tambati Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2024 to 31.03.2025. **(Tender Fee Rs. 500/- + 18% GST)** | **Rs.5,96,904/-** |
| Tender -12 **(RFX.7000030517)** | RFx E-tender for Hiring of MMV vehicle at EHV Lines Maint Sub DnPanvel-II under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2024 to 31.03.2025. **(Tender Fee Rs. 500/- + 18% GST.)** | **Rs.5,99,904/-** |
| Tender-13 **(RFX.7000030516)** | RFx E-tender for Hiring of MMV vehicle at EHV Lines Maint Sub DnPanvel-I under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2024 to 31.03.2025. **(Tender Fee Rs. 500/- + 18% GST.)** | **Rs.5,99,904/-** |
| Tender-14 **(RFX.7000030533)** | RFx E-tender for Hiring of MMV vehicle at EHV Substation Maint Sub DnAptaunder EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2024 to 31.03.2025. **(Tender Fee Rs. 500/- + 18% GST.)** | **Rs.5,99,904/-** |
| Tender-15 **(RFX.7000030492)** | RFx E-tender for Hiring of vehicle at 220kV Taloja Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2024 to 31.03.2025. **(Tender Fee Rs. 500/- + 18% GST)** | **Rs.5,96,904/-** |

EMD 1% of estimated cost for each Tender. **Submission of bids from 11.03.2024 to 18.03.2024 up to 23:59 hrs, Opening date:-19.03.2024 @ 11:00 Hrs.** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/Contact Person: The ADDL. Executive Engineer (O) Tel No. 022-27465410, Mob. No. 8530095666 E-mail ID ee7210@mahatransco.in

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER, EHV(O&M) DN PANVEL.**

## निवडक



### आदिवासींना ब्लँकेट, खाऊचे वाटप

**उरण :** महिला दिन आणि अ‍ॅड. प्राची निग्रेश पाटील, यांच्या वाढदिवसानिमित्त विंधणे आदीवासी वाडी, कंठवली आदिवासी वाडी, रानसई ठाकूर वाडी येथे ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास उरण समालोचन समितीचे अध्यक्ष जगदीश ठाकूर साहेब, लकी स्पोर्ट्‌र्सचे अध्यक्ष लक्ष्मण पाटील, अ‍ॅड. रूपेश ठाकूर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमासाठी राज घरत (कंठवली), भूषण डाकी (बोरखार), सुधीर बुवा पाटील, नेत्रा थापा, सानिया पाटील, सार्थक पाटील, जय ठाकूर (चिरले) आदी उपस्थित होते.

### सत्याग्रह महाविद्यालयात महिला दिन

**नवी मुंबई :** खारघर येथील सत्याग्रह अध्यापक महाविद्यालयाच्या वतीने जागतिक महिला दिन प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांच्या अध्यक्षतेखाली तर प्रमुख पाहुण्या प्राचार्या नेहा कपोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. शिक्षण घेऊन महिलांनी जिवनाच्या सर्व क्षेत्रात अग्रभागी राहवे, असा सल्ला डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी दिला. या वेळी एन. एल. सुर्यवंशी, सुंदर वसावे, संजीवकुमार सोमवंशी, किशोर शिंदे, अनिल मुळे यांची विशेष उपस्थिती होती. सिध्दार्थ मल्टिपरपज रेसिडेन्शल हायस्कूल, डॉ. जी. के. डोंगरगावकर इंटरनॅशनल स्कूल, अजिंठा इंटरनॅशनल स्कूलचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी महिला दिनाच्या कार्यक्रमात उपस्थित होते.

### पहिलीपासूनच स्पर्धा परीक्षा



**नवी मुंबई :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालयात बोर्ड परीक्षेच्या धर्तीवर इयत्ता पहिली पासूनच स्पर्धा परीक्षांचे आयोजन करण्यात आले आहे. माजी महापौर सुधाकर सोनवणे यांच्या प्रेरणेने आपल्या शाळेने इनोव्हेटिव्ह अशा इयत्ता पहिली पासून ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धापरीक्षेचे आयोजन केले होते. परीक्षाकेंद्राला माजी नगरसेविका रंजना सोनवणे, प्रभारी विस्तार अधिकारी कल्पना गोसावी, केंद्रसमन्वयक रमेश तेली, केंद्रसमन्वयक सुप्रिया पायरे, रवींद्र म्हात्रे, मुख्याध्यापक जे.पी.सिंग, पाल सर यांनी भेट दिली.

# नवी मुंबईत शिक्षण, आरोग्य सुविधेचा विस्तार

## मनपाच्या दिघा यादवनगर शाळेचे लोकार्पण



> यादव नगरच्या या नवनिर्मित शाळेसमोरच मैदानावर बिअर बार आणि लॉजिंग बोर्डिंगचा घाट काही समाजकंटकांनी घातला आहे त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनावर विपरीत परिणाम होण्याचा धोका आहे. शिक्षणासारख्या पवित्र वास्तुसमोर लॉजिंग बोर्डिंग आणि बिअरबार कदापि होऊ देणार नाही
> –आमदार गणेश नाईक

**नवी मुंबई : बातमीदार**

दिघा यादवनगर येथील नवी मुंबई महापालिकेच्या शाळा क्रमांक ७७चे लोकार्पण सोमवारी (दि. ११) लोकनेते आमदार गणेश नाईक यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात झाले. लोकनेते आमदार नाईक यांच्या सूचनेनुसार शाळेची ही इमारत उभारण्यात आलेली आहे. यादव नगर हा सर्वसामान्य रहिवाशांचा झोपडपट्टी परिसर आहे.

असुविधाजनक आणि कोंदट वातावरणातील शाळा इमारतीमध्ये येथील गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घ्यावे लागत होते. ही अडचण लक्षात घेत आमदार गणेश नाईक यांनी महापालिका प्रशासनाला सुचित करून तळ अधिक तीन मजली प्रशस्त शाळेची इमारत बांधून घेतली. २०१८मध्ये या शाळेच्या कामाला मंजुरी मिळाल्यानंतर २०२० पर्यंत शाळेचे बांधकाम पूर्ण होत आले होते, मात्र शाळा बांधून तयार असतानाही त्याचे उद्घाटन झाले नव्हते. त्यामुळे सोमवारी या शाळेचे उद्घाटन करण्यात आले. स्थानिक आमदार म्हणून मतदार संघातील जनतेच्या अडीअडचणी दूर करण्याचे कर्तव्य आपण करीत आहोत आणि पुढेही करीत राहणारच अशी प्रतिक्रिया लोकनेते आमदार नाईक यांनी या वेळी दिली.

नवीन शाळा इमारतीमधील वर्ग खोल्या लवकरात लवकर स्वच्छ करून आवश्यक सर्व सुविधा निर्माण करून ज्ञानदानाकरिता या शाळा इमारतीचा वापर सुरू करावा, अशा सूचना लोकनेते आमदार नाईक यांनी या वेळी शिक्षण विभागाला दिल्या.

उद्घाटनावेळी माजी महापौर सागर नाईक, माजी महापौर सुधाकर सोनवणे, स्थायी समितीचे माजी सभापती नवीन गवते, माजी नगरसेविका अपर्णा गवते, दीपा गवते, माजी नगरसेवक बाळकृष्ण पाटील, सुरेश पाल, सुदर्शन जिरगे, चारुदत्त ठाणाम्बीर, अनिल नाकते, यल्लू शिंगे, अरुण पडते, वीरेश सिंग, श्री सोनकांबळे यांच्यासह यादव नगरमधील स्थानिक रहिवाशी उपस्थित होते.

## शिरवणे येथे प्राथमिक आरोग्य केंद्राचे लोकार्पण

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने शिरवणे येथे कै.सौ. लक्ष्मी ज. सुतार नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे लोकार्पण नवी मुंबईचे माजी महापौर जयवंत सुतार यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी सन १९९२ साली नवी मुंबई महापालिकेने शिरवणे येथे नागरी आरोग्य केंद बांधले होते. ते मोडकळीस आल्याने त्यांनतर नव्याने आरोग्य केंद्राची निर्मिती करण्यात आली. दिवसेंदिवस नागरिकांची वाढती लोकसंख्या लक्षात घेता रुग्णांना आरोग्य केंद्राची जागा अपुरी पडू लागली तसेच डॉक्टर व आरोग्य कर्मचारी यांना जागा उपलब्ध नसल्याने एक सुसज्ज असे आरोग्य केंद्र निर्माण व्हावे यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करून तळमजला अधिक दोन मजले असे आरोग्य केंद्र बांधण्याचे प्रास्ताविक देण्यात आले. त्यानुसार प्रशासनाने त्याची पुर्तता करून सदर आरोग्य केंद्रामध्ये तळ मजल्यावर रुग्णांसाठी स्वतंत्र केसपेपर कक्ष, औषध भांडार, प्रयोगशाळा, औषध वाटप अशी स्वतंत्र कक्ष निर्माण केली आहेत तसेच पहिल्या मजल्यावर आरोग्य केंद्र कर्मचारी कक्ष व दुसऱ्या मजल्यावर नागरिकांना व रुग्णांना विविध आजारी विषयी माहिती देण्यासाठी तसेच आरोग्य कर्मचारी यांच्यासाठी विविध आरोग्य विषयी बैठक घेण्यासाठी सभागृहाची निर्मिती करण्यात आली आहे. शिरवणे प्रभागातील नागरिकांना दिलेल्या सुसज्ञ अशा आरोग्य केंद्राची वचनपुर्ती पुर्ण केलेली आहे. तसेच सुसज्ञ अशा आरोग्य केंद्राचा शिरवणे, जुईनगर, शिवाजी नगर, महात्मा गांधी नगर,



रमेश मेटल, सरोज क्वारी, डी.आर.पाटील क्वारी येथील तसेच परिसरातील नागरिकांना लाभ होणार आहे अशा भावना माजी महापौर जयवंत सुतार यांनी व्यक्त केल्या.

या वेळी भाजप नवी मुंबईचे उपाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, माजी नगरसेविका तथा भाजपा महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा माधुरी सुतार, समाजसेविका निर्मला सुतार, गणेश मंदिर चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष नामदेव ठाकुर, आरोग्य केंद्राचे डॉ. संजय यमगर, समाजसेवक दत्ताशेठ पाटील, प्रभाकर ठाकुर, जयेंद्र सुतार, हनुमंत रोडे, नरेश सुतार, प्रतिक सुतार, मोहन कदम, जयेश पवार, जयेश धुमाळ, दिपेश पाटील, राजन घरत, सुभाष जाधव, आरोग्य केंद्राचे कर्मचारी रिमा सिंग, विद्या चव्हाण, बाळकृष्ण वर्ये, भाजपचे पदाधिकारी पांडुरंग सुतार, महेंद्र पाटील, जयवंत सुतार, नितीन शेडगे, प्रणल पाटील, रोशन किरडवकर, किरण गोडसे, निळकंठ सुतार, कालिदास जोशी, किशोर पवार तसेच प्रभागातील नागरिक व भाजपचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## ‘रायगड सम्राट’च्या विशेषांकाचे प्रकाशन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथे शंकर वायदंडे संपादित रायगड सम्राट न्यूज व वेब आणि वेब पोर्टल वर्धापन दिन विशेष अंकाचे प्रकाशन रविवारी (दि. १०) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले

या वेळी संपादक वायदंडे यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे स्वागत केले. भाजप अल्पसंख्याक सेलचे सय्यद अकबर, पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समिती अध्यक्ष निलेश सोनावणे, स्वाभिमानी रिपाई जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे, उद्योजक भावेश भाई धनेशा, वंचित बहुजन आघाडी पनवेल जिल्हाध्यक्ष डी. डी. गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य राज सदावर्ते, पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समितीचे संघटक रवींद्र गायकवाड, रायगड पनवेलचे संपादक संतोष भगत, पनवेल वैभव संपादक अनिल कुरगुडे, दैनिक युवक आधार संपादक संतोष आमले, उपसंपादक सुरेश भोईर, पत्रकार राजेंद्र कांबळे, पत्रकार अक्षय कांबळे आदी मान्यवरांचे स्वागत रायगड सम्राट परिवाराकडून करण्यात आले



दरम्यान, सामाजिक कार्यकर्ते चौक येथे व्यसनमुक्तीचे काम करणारे आई बाबा फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष प्रवीण नवले यांना रायगड सम्राट समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या वेळी सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील, वंचित बहुजन आघाडीचे मुजमुले आणि टीम पत्रकार रोहिता साळुंखे पत्रकार आनंद कोंडिलकर पत्रकार कोमल डांगे आदी उपस्थित होते. उपसंपादक शिवाजी वायदंडे, सहसंपादक प्रदीप वायदंडे, राहुल पोपलवार, अमन तायडे, करण बोरुडे यांनी मेहनत घेतली.

# उरण रेल्वे : तिसऱ्या मुंबईचा पाया

**उरणकरांचे स्वप्न असलेल्या उरण ते नवी मुंबई मार्गावरील खारकोपर–उरण या दुसऱ्याटप्प्यातील लोकलसेवेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अटल सेतू लोकार्पण सोहळ्यातून दूरदृश्य प्रणालीद्वारे हिरवा झेंडा दाखवला. या मार्गावरील नवी मुंबई ते खारकोपर हा टप्पा यापूर्वीच सुरू झालेला आहे. आता उरणकरांना नवी मुंबईपर्यंत तसेच पुढे मुंबई, ठाणे असा प्रवास रेल्वने करता येतोय. ही रेल्वेसेवा मोदी सरकारच्या विकासाची गॅरंटी दर्शवत आहे. दै. रामप्रहरच्या वाचकांसाठी या रेल्वेसेवेची सविस्तर माहिती देणारी लेखांची मालिका...**

**विकासाची गॅरंटी**

सध्या उरण–नेरूळ लोकल प्रवासात उरण, द्रोणागिरी(बोकडविरा), न्हावाशेवा (नवघर), रांजनपाडा (शेमटीखार), गव्हाण, बामणडोंगरी, तरघर सागरसंगम, दारावे या स्थानकांचा समावेश आहे. तर उरण ते नेरूळ अशी रेल्वे लोकल सेवा सुरू असून, थेट छत्रपती शिवाजी टर्मिनल मुंबई अशी रेल्वे सेवा सुरू करण्याच्या प्रवाशांच्या मागणीचाही विचार करून उरण ते मुंबई लोकल सेवा सुरू करण्यासाठी लेखी निवेदनाद्वारे आमदार महेश बालदी यांनी मागणी केली आहे. त्यामळे उरण–मुंबई हार्बर लाईन थेट रेल्वे लोकल सेवा लवकरच सुरू होणार आहे.

त्यामुळे आता उरण वासियांना मुंबई, ठाणे, नवी मुंबई व अन्य मार्गांवर प्रवास करणारे दैनंदिन प्रवासी, शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थी–विद्यार्थिनी यांच्या मासिक रेल्वे प्रवासी पासच्या नाममात्र रकमेच्या आकारणीमुळे पालकांच्या खिशाची कात्री कमी होऊन बचत होण्याला मदत झाली आहे. एनएडी करंजा, ओएनजीसी, वीज निर्मिती केंद्र, बीपीसीएल आणि जेएनपीए बंदरातील चार टर्मिनल आणि त्या अनुषंगाने तालुक्यासह आजूबाजूच्या परिसरात देश, विदेशातील आयात – निर्यातीसाठी साकरण्यात आलेली शेकडो गोदामे यामध्ये नोकरी, उद्योग धंद्यानिमित्त दररोज प्रवास करणारे दैनंदिन प्रवाशांनाही रात्रंदिवस प्रवासाची संधी या उरण–नेरूळ लोकल रेल्वे मार्गामुळे उपलब्ध झाली आहे. त्यामुळे सुरक्षित आणि गतिमान प्रवासाची संधी प्राप्त झाल्याचे समाधान येथील दैनंदिन प्रवासी व्यक्त करीत आहेत.

खारकोपर–उरण रेल्वे मार्गावर पाच स्थानके असून १४.६ किमीच्या रेल्वे मार्गावर गव्हाण, रांजणपाडा, न्हावा शेवा, द्रोणागिरी आणि उरण ही पाच रेल्वे स्थानके आहेत. उरण नेरूळ रेल्वे मार्गामुळे सीएसएमटी ते उरण असा थेट रेल्वेप्रवास करता येणार आहे. त्यामुळे मुंबई नवी मुंबई आणि उरण शहराशी जोडली गेली. हा मार्ग महत्त्वाचा आहे. **(समाप्त)**

**–जीवन केणी**





**उलवे नोड : भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते स्व. दि.बा. पाटील यांच्या सहकारी व कोल्हापूरच्या माजी नगरसेविका भारतीताई पोवार यांनी येथील रामबागला भेट दिली. त्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वागत केले. या वेळी वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, न्हावा ग्रामपंचायत सदस्य सागर ठाकूर, म्हसेश्वर मंदिर कमिटी अध्यक्ष सी.एल. ठाकूर आदी उपस्थित होते.**



**नवी मुंबई : उत्तराखंड समाजाचा कौथीग महोत्सव रामलीला मैदान येथे सुरू आहे. दहा दिवस आयोजित या महोत्सवात विविध सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रम होत आहेत. या महोत्सवात नेव्ही डे साजरा करण्यात आला. या वेळी राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त कोस्ट गार्ड डीआयजी कैलास नेगी, भारतीय नौसेनेमधील ब्रिगेडर पियुश बडोनी आदी उपस्थित होते. दरम्यान, नेव्हीमधून सेवानिवृत्त झालेल्या ५५ नागरिकांना स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.**

## धानसर गावात आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

होपमिरर फाउंडेशनने संस्थापक रमजान शेख यांच्या मूळ गावी धानसर येथे फाउंडेशनच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. अपोलो हॉस्पिटल, नवी मुंबई यांच्या सहकार्याने होपमिरर टीमने धानसरमध्ये आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते.



गावातील ग्रामस्थांसाठी आरोग्यविषयक जनजागृती आणि विविध आजारांवर दर्जेदार उपचार मिळावेत यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. लोकांची आरोग्य स्थिती तपासण्यासाठी आणि आरोग्य व्यवस्थापनाबाबत सल्ला देण्यासाठी कार्यकारी आरोग्य तपासणी कार्यक्रम घेण्यात आला. या शिबिरात एकूण १५० हून अधिक लोकांनी उपस्थित राहून आरोग्य तपासणी करून घेतली. आरोग्य तपासणी शिबिरात BMI, BCA (शरीर रचना विश्लेषण), रक्तदाब, यादृच्छिक रक्तातील साखर, ECG, हाडांची घनता, डोळ्यांची तपासणी, डॉक्टरांचा सल्ला इत्यादींचा समावेश होतो. आरोग्य तपासणी उपक्रमांना गावकऱ्यांचा सकारात्मक प्रतिसाद हा समाजामध्ये आरोग्य आणि निरोगीपणाला चालना देण्यासाठी सामायिक वचनबद्धता दर्शविते आणि ग्रामीण आणि कमी सेवा असलेल्या भागात आरोग्य सेवांमध्ये प्रवेश सुधारण्यासाठी चालू असलेल्या प्रयत्नांचे महत्त्व अधोरेखित करतो.

## भाजपतर्फे कळंबोलीमध्ये महिलांसाठी आरोग्य शिबिर

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

जागतिक महिला दिनानिमित्त सेक्टर ८ येथे महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर भाजप महिला मोर्चा अध्यक्ष कळंबोली मंडल अध्यक्ष मनीषा निकम यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले होते.

शिबिरासाठी माधव बागच्या टीमचे सहकार्य लाभले. महिलांना तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला व आहार व व्यायाम विषयक मार्गदर्शनही या वेळी करण्यात आले. आरोग्य तपासणीमध्ये ईसीजी, रँडम ब्लड शुगर, ब्लड प्रेशर, वजन, हार्ट रेट, ऑक्सिजन या तपासण्या



करण्यात आल्या. महिलांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद या शिबिराला मिळाला.

या शिबिरावेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस अ‍ॅड. वृषाली वाघमारे, संध्या शारबिद्रे, पनवेल शहर अध्यक्ष राजश्री वावेकर, कळंबोली मंडल अध्यक्ष मनीषा निकम, सरचिटणीस दुर्गा सहानी, कळंबोली मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक अमर पाटील आदी उपस्थित होते.

# मुंबई-पुणे महामार्गावर ब्लॅक स्पॉट

## वारंवार घडताहेत अपघात; उपाययोजनांची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गावर खालापूर हद्दीत १४ किलोमीटर पट्ट्यात सुरक्षा उपाययोजनांची कमतरता असून जीवघेणे अपघात घडत आहेत. द्रुतगती मार्गाप्रमाणे (एक्स्प्रेस वेवर) सुरक्षेच्या दृष्टिकोनातून जुन्हा महामार्गावरही विविध उपाययोजना राबविण्यात याव्यात, अशी मागणी प्रवासी व वाहनचालकांमध्ये होत आहे.

मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) आणि आयआरबी अधिकाऱ्यांसोबत ब्लॅक स्पॉटची पाहणी केली होती. खालापूर तालुक्याच्या हद्दीतून जवळपास २४ किलोमीटरचा पट्टा मुंबई-पुणे महामार्गात येतो. रस्त्याचे दुपदरीकरण झाले असले तरी अनेक ठिकाणी महामार्गावर धोकादायक वळण, अपुरी लेन कटिंग, सर्विस रोड नसणे, छोट्या धोकादायक मोऱ्यांची कामे प्रलंबित आहेत. विशेषता कलोते, लोधिवली, चौक गावाजवळील धोकादायक लेन कटिंग, वावंढळनजीक पूल हे अपघाताचे ब्लॅक स्पॉट बनले आहेत. मागील चार महिन्यांत या भागात



१५पेक्षा अधिक अपघात घडले असून पाच जणांना जीव गमावावा लागला आहे, तर १०हून जास्त जण गंभीर जखमी झाले आहेत.

अपघात नियंत्रणासाठी या भागातील सामाजिक कार्यकर्ते व माजी उपसभापती श्याम साळवी यांनी सातत्याने एमएसआरडीसी आणि आयआरबीकडे पाठपुरावा सुरू ठेवला आहे. साळवी यांच्या पाठपुराव्याची दखल खासदार श्रीरंग बारणे यांनी घेत चौक डाक बंगला, चौक फाटा, वावंढळ पूल या ठिकाणी पाहणी करीत आयआरबी आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ अधिकाऱ्यांना सुरक्षा उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या होत्या, पण वावंढळ पूल वगळता विशेष उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून टोल वसुली केली जात असल्याने सुरक्षित प्रवासाची हमीदेखील मिळावी, अशी अपेक्षा प्रवासी व्यक्त करीत आहेत.

**“मुंबई-पुणे महामार्गावर प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने उपायोजना करण्यात येत आहे. अनधिकृत लेन कटिंग याशिवाय ब्लॅक स्पॉट ठिकाणी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने सुरुवात करणार आहोत.**
**-एस.काजरेकर,**
**वरिष्ठ अभियंता, एमएसआरडीसी**

# नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करायचेय -आमदार अनिकेत तटकरे

## नागोठण्यात राष्ट्रवादीच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन



**नागोठणे : बातमीदार**

गेले अनेक वर्षांपासून नागोठणे राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यालय तत्कालीन ज्येष्ठ समाजसेवक कै. तात्यासाहेब टके व नेते दिलीपभाई टके यांचे निवासस्थानच आहे. आज नागोठणे राष्ट्रवादीच्या कार्यालयाची दुसरी शाखा उभी राहिली असून या कार्यालयाचा लोकांच्या अडीअडचणी व विविध प्रश्न सोडविण्यासाठी उपयोग झाला पाहिजे. लवकरच जाहीर होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या उमेदवाराला भरघोस मतांनी निवडून आणून आपल्याला नागोठणे ग्रामपंचायत निवडणुकीतील अपयशाचा वचपा काढायचा आहे. नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करायचे आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनो कामाला लागा, असे आवाहन आमदार अनिकेत तटकरे यांनी केले.

नागोठणे गांधी चौक येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास राष्ट्रवादीचे नेते भाईसाहेब टके, शिवराम शिंदे, सदानंद गायकर, मधुकर ठमके, हरिश काळे, विलास चौलकर, राकेश शिंदे, संतोष कोळी, बाळासाहेब टके, प्रकाश जैन, अनिल काळे, चंद्रकांत गायकवाड, कृष्णा धामणे, विनय गोळे, सचिन कळसकर, अतुल काळे, निवास पवार, प्रमोद जांबेकर, दिपेंद्र आवाद, राजेंद्र शिंदे, हिराजी शिंदे, अलिम मांडलेकर, सुधाकर जवके, सुधाकर पारंगे, दिलीप आवाद, बिपीन सोष्टे, दिलीप शहासने, आशा काळे, अमिता शिंदे, रिचा धात्रक, सुजाता जवके, श्वेता चौलकर,प्रतिभा तेरडे, निष्ठा विचारे, प्रगती आवाद, पूनम काळे, सखाराम ताडकर, प्रथमेश काळे, कुणाल तेरडे, मंदार चितळे, अमित जांबेकर, दिनेश घाग, रोहिदास हातनोलकर, रवींद्र वाजे, मनोज ताडकर, अंकुश ताडकर, मोरेश्वर तेलंगे, विजय पाटील, किसन बोरकर, नाना बडे, उमर सांगडे, निलेश म्हात्रे, किशोर कदम, काजीम पानसरे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार अनिकेत तटकरे पुढे म्हणाले की, येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत महायुतीतील मित्रपक्षांना सोबत घेऊन आपल्याला काम करायचे आहे. विरोधी पक्षातील मंडळी आपल्यात कलह निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत, कारण त्यांच्या पायाखालची वाळू सरकली असल्याने ते वणवण भटकत फिरत आहेत. त्यांनी आपल्या मतदारसंघाचा व कोकणचा काय विकास केला हे सांगावे. आपण त्यांच्या टिकेला उत्तर देण्याची काहीही गरज नाही. आपण महायुतीच्या उमेदवाराला निवडून आणून नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करायचे आहे. हेच आपले मुख्य उदिष्ट आहे.

# महिलेला रक्तपुरवठा करून दिले जीवदान

## माणगाव सेवाभावी संस्थेचे नातेवाईकांनी मानले आभार

**माणगाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील बाहे गावच्या महिलेला प्रकृती अस्वास्थ्यामुळे रक्ताची गरज होती. त्या महिलेला आवश्यक असलेल्या दोन बाटल्या रक्तपुरवठा माणगाव उपजिल्हा रुग्णालयातून शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबिर सेवाभावी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी त्वरित विनामूल्य उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे रुग्ण महिलेच्या नातेवाईकांनी या सेवाभावी संस्थेचे मनःपूर्वक आभार मानले.



बाहे गावातील महिला सुवर्णा आंबाजी मालुसरे (वय ५५) या महिलेला प्रकृती अस्वास्थ्यामुळे रोहा येथील वैरागी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. या महिलेची प्रकृती पाहिल्यावर तेथील डॉक्टरांनी त्यांना दोन बाटल्या रक्ताची आवश्यकता असल्याचे सांगितले. रुग्ण महिलेचे बंधू जगदीश रामचंद्र गोरीवले यांनी माणगाव येथील आपल्या ओळखीच्या असणाऱ्या शिक्षिका विनया विवेक जाधव यांच्याशी संपर्क साधून त्यांनी लगेचच शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबिर सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष सलीम शेख यांच्याकडे संपर्क साधला. शेख यांनी माणगाव उपजिल्हा रुग्णालयातील प्रयोगशाळा सहाय्यक जितेश मोहिते यांच्याशी संपर्क साधून त्यांना रोहा येथील महिलेला ए पॉझिटिव्ह ग्रुपच्या दोन रक्त बॉटलची आवश्यकता असल्याचे सांगितल्यावर मोहिते यांनी रक्त बॉटल उपलब्ध करून देतो असे म्हटले.

दरम्यान, शेख यांनी रुग्ण महिलेच्या नातेवाईकांना बोलावून उपजिल्हा रुग्णलयात रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी मनीषा नवाले यांची भेट घेऊन रक्ताच्या बाटल्या जगदीश गोरीवले यांच्याकडे देण्यात आल्या. या वेळी संस्थेचे सचिव शंकर शिंदे, खजिनदार अरुण क्षीरसागर, सहसचिव प्रा. हर्षल जोशी, कायदेशीर सल्लागार भालचंद्र खाडे हेही उपस्थित होते. संस्थेच्या या सेवाभावी कार्यामुळे बहिणीचे प्राण वाचल्याने गोरीवले यांनी आभार मानले.

# माणगाव येथे उद्या मोफत नेत्रतपासणी शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेलच्या वतीने माणगाव येथे तालुक्यातील विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे बुधवारी (दि.१३) सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत पेपर विक्रेते नितीन मेथा यांचे सभागृह जुने एसटी स्टँड या ठिकाणी करण्यात आले आहे.

या शिबिरात मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या रुग्णांनी येताना सोबत आधार कार्ड व रेशन कार्ड याची झेरॉक्स प्रत आणावी. त्याचप्रमाणे मधुमेहाची व रक्तदाबाची औषधे सुरू असल्यास तीदेखील घेऊन यावीत. रुग्णाला शस्त्रक्रियेसाठी जाण्याची, राहण्याची, जेवणाची व परत आणून सोडण्याची मोफत सोय करण्यात आली आहे.

शिबिरात सहभागी होणाऱ्या नेत्ररुग्णांनी नावनोंदणीकरिता विधिता मनीष मेथा (८६९८७४०६४०), सुप्रिया संतोष शिंदे (९०४९६६५५९८) यांच्याशी संपर्क साधावा तसेच या शिबिराचा लाभ समाजातील सर्व गरीब, गरजू रुग्णांनी घ्यावा, असे आवाहन आहे.

# पुरस्कारप्राप्त हेदवली शाळेचा गौरव; ३२ लाखांचे पारितोषिक पटकाविले

## कर्जत येथे साजरा केला आनंदोत्सव

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील हेदवली येथील जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा राज्य सरकारच्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात महाराष्ट्र राज्यात दुसरी आणि कोकण विभागात पहिली आली. याबद्दल तब्बल ३२ लाखांचे पारितोषिक या शाळेने पटकाविले आहे.

निसर्गरम्य वातावरण, सुसज्ज इमारत, खो-खो व कबड्डी यांची मैदाने, शाळेच्या आवारात विविध प्रकारच्या भाजीपाल्याने बहरलेली परसबाग, शालेय पोषण आहार स्वयंसेवक, शैक्षणिक साहित्य निर्मिती, शंभर मोठ्या झाडांची लागवड, लेझिम पथक, श्रमदानातून सभागृहाचे बांधकाम, ॲक्यूप्रेशर पथ, हँगिग गार्डन, वाचन कट्टा, औषधी वनस्पती बगीचा, टाकावूपासून



टिकावू वस्तूंची निर्मिती, वृक्ष लागवडीसाठी वेगळी संकल्पना, प्रशस्त सभागृह, स्वच्छतागृह आणि सोलर विजेची सोय, तंबाखूमुक्त परिसर, परिसरात टाळ मृदंगाचे बोल, पुस्तकाच्या जगात.. शाळेच्या आवारात मांडणी, वाचनालय असे अनेक उपक्रम हेदवली येथील शाळेत राबविले गेले आहेत. त्यामुळे हेदवली येथील शाळा मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात राज्यात दुसरी आली.

मुख्याध्यापक किसन दरवडा, शिक्षक बाळाराम गायकर, प्रकाश अहिरे, शांताराम पवार, भरत ढाकणे यांनी तालुका पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी संतोष दौंड यांचे मार्गदर्शन घेऊन नावीन्यपूर्ण शाळा बनवली आहे.

राज्यात एक लाखांहून अधिक शाळांचा सहभाग असताना हेदवली शाळेने दुसरा क्रमांक पटकावला. राज्यात दुसऱ्या क्रमांकद्दल २१ लाखांचे, तर कोकण विभागात पहिला क्रमांक मिळविला म्हणून ११ लाखांचे असे ३२ लाखांचे पारितोषिक शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आणि तालुका गटशिक्षण अधिकारी यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हस्ते स्वीकारले. या सोहळ्यास शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर आदी उपस्थित होते. शाळेच्या या कामगिरीबद्दल पारितोषिक घेऊन आल्यावर कर्जत येथे आनंदोत्सव साजरा करण्यात आला.


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-08/24-25 /7000030618 | Providing 14 No of Skilled labour (ITI certified Technicians in Electrical / Wireman trade) for field work under 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane for F.Y. 2024-25 | Rs 41,87,956.08/- | 17.03.2024 up to 23:59 hrs |
| 2 | e-Tender-09/24-25 /7000030619 | Work of Providing 2 no of skilled labour (LDC cum computer operator) & 2 no unskilled labour (peon) at 400kV R.S. (O&M) Dn., Nagothane for 2024-25 | Rs 11,16,333/- | 17.03.2024 up to 23:59 hrs |

EMD fee 1% of estimate amount & Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: MITESH GOYAL Mob No. 9461456635 Email ID: ee7230@mahatransco.in Note: All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
**EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**


# मध्य रेल्वेतर्फे महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने मुख्यालय आणि विभागांमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

केंद्रीय कर्मचारी लाभ निधीच्या अंतर्गत आयोजित अपराजिता कार्यक्रमात, मध्य रेल्वेचे अतिरिक्त महाव्यवस्थापक श्री चित्तरंजन स्वैन यांनी सशक्त नारी पुरस्कार प्रदान केले यामध्ये तंत्रज्ञ, फिटर, पॉइंट वुमन तसेच कार्यालय सहायक, सचिव, कार्यालय अधीक्षक, इंजिन चालक, ट्रेन व्यवस्थापक, तिकीट परीक्षक, अनुवादक, अभियंता अशा विविध विभागांमधील मध्य रेल्वेच्या २१ महिला कर्मचाऱ्यांना सन्मानित करण्यात आले.

याशिवाय, महिला सक्षमीकरण उपक्रमांचा एक भाग म्हणून इतरांवर अवलंबून असलेल्या महिला रेल्वे कर्मचाऱ्यांना शिलाई मशीन आणि सायकल्सचे वाटपही करण्यात आले.

या वेळी बोलताना श्री स्वैन म्हणाले की, महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना विकास प्रक्रियेच्या मुख्य प्रवाहात आणणे होय. प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शिका अश्विनी अय्यर तिवारी विशेष निमंत्रित व अतिथी प्रमुख वक्ते म्हणून कार्यक्रमास उपस्थित होत्या. मध्य रेल्वेच्या प्रधान मुख्य कार्मिक अधिकारी रेणू शर्मा यांनी स्वागतपर भाषण केले. या वेळी मध्य रेल्वेचे विभागप्रमुख आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ज्या महिलांना गौरविण्यात आले त्यांचे अभिनंदन होत आहे.





# भाल-विठ्ठलवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील पश्चिमेकडे निसर्गरम्य समुद्रकिनारा लाभलेल्या तीर्थक्षेत्र भाल-विठ्ठलवाडी या विठू-माऊलीच्या गावामध्ये सालाबादप्रमाणे १४ ते २२ मार्चदरम्यान टाळमृदुंगाच्या गजरात अखंड हरिनाम सप्ताह साजरा होणार आहे.



या नऊ दिवसांमध्ये काकड आरती, ज्ञानेश्वरी पारायण, सामुदायिक हरिपाठ, सांज आरती, सकाळ-संध्याकाळ प्रदक्षिणा, प्रवचन, अभंग गाथा, कीर्तन, भजन, भारूड, हरि जागर सादर होणार आहेत. पंचक्रोशीत पर्वणी समजल्या जाणाऱ्या विठ्ठल रखुमाईचा छबिना निघणार आहे. सामाजिक बांधिलकी जोपासणारे उपक्रम, कार्यक्रम, बोध देणारे पौराणिक देखावे सादर केले जाणार आहेत. महाप्रसादही मिळणार असून लळीताचा कार्यक्रम म्हणून विनोदी नाटक सादर केले जाणार आहे.

सर्वांनी भक्तीचा महिमा पाहण्यासाठी व महाप्रसादासाठी उपस्थित रहावे, असे आवाहन ग्रामस्थांच्या वतीने नवनिर्वाचित, आजी-माजी विठ्ठल रखुमाई ट्रस्ट, ग्रामस्थ मंडळ यांजकडून करण्यात आले आहे.


**महाराष्ट्र शासन**
**सा. बां.(आदिवासी) विभाग, ठाणे**
**संक्षिप्त ई-निविदा सुचना क्रमांक-४५ सन २०२३-२४**

कार्यकारी अभियंता, सा.बां.(आदिवासी) विभाग, ठाणे दुरध्वनी क्र.०२२-२५४१००४६ हे ई-निविदाव्दारे (ऑनलाईन) खालील कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील **आदिवासी विकास विभागाकडील नोंदणीकृत कंत्राटदार** यांचेकडून मागवित आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | निविदा रक्कम (अ+ब) (रु.लक्ष) | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|
| १. | कळंबोली ता.पनवेल जि.रायगड येथे आदिवासी मुलांसाठी शासकीय आदिवासी वसतीगृह इमारत बांधकाम करणे. (G+७) | १२३३.३४ | वर्ग-१ क व त्यावरील |
| २. | घनसोली, नवी मुंबई जि.ठाणे येथे आदिवासी मुलांसाठी शासकीय वसतीगृह इमारत बांधकाम करणे. (G+५) | ७०९.१४ | वर्ग-२ व त्यावरील |
| ३. | कोपरखैरणे, नवी मुंबई जि.ठाणे येथे आदिवासी मुलींसाठी शासकीय वसतीगृह इमारत बांधकाम करणे. (G+६) | ९९५.०० | वर्ग-१ क व त्यावरील |

- निविदा डाऊनलोड करण्याचा दिनांक दि.१२/०३/२०२४ रोजी ते दि.१९/०३/२०२४ पर्यंत.
- निविदा पूर्व बैठक दि.१५/०३/२०२४ रोजी दु.१२.०० वाजता मा.मुख्य अभियंता, बांधकाम भवन कक्ष, आदिवासी विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई यांचे कार्यालयात (शक्य झाल्यास) किंवा ऑनलाईन.
- ई-निविदा उघडण्याचा दिनांक- २१/०३/२०२४
- सर्व पात्र/ इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या http://mahatenders.gov.in या पोर्टलवर enrolled करणे आवश्यक आहे.

जा.क्र.साबां (आ)विठा/ठाणे/निविदा/क्रं.४५/१२०२
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.(आदिवासी) विभाग, ठाणे
सा.बां. आवार, स्टेशनरोड, ठाणे-४०० ६०१
ईमेल पत्ता :- eepwdtribalthane@gmail.com
दुरध्वनी क्रमांक :- ०२२-२५४१००४६
दिनांक :- ०७/०३/२०२४

सही/-
कार्यकारी अभियंता,
सा.बां.(आदिवासी) विभाग,ठाणे

# दिल्लीचा बंगळुरूवर थरारक विजय

## रिचा घोषची झुंज अपयशी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रिचा घोषची दमदार फटकेबाजी आणि अथक प्रयत्न रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला विजय मिळवून देण्यात अपयशी ठरले आणि दिल्ली संघाने आरसीबीच्या संघावर अवघ्या एका धावेने विजय मिळवला. या विजयासह मुंबई इंडियन्सनंतर दिल्लीच्या संघाने प्लेऑफमध्ये प्रवेश केला आहे.

आरसीबीच्या संघाला डावाच्या सुरुवातीलाच मोठा धक्का बसला तो कर्णधार स्मृती मानधनाच्या विकेटने. स्मृती सात चेंडूंत ५ धावा करत लिस कॅप्सीच्या चेंडूवर बाद झाली. यानंतर अनुभवी फलंदाज एलिस पेरी (४९) आणि मोलिनक्स (३३) यांनी संघाचा डाव सावरला, पण त्यांना मोठी धावसंख्या करता आली नाही. अनुभवी फलंदाज पेरीचे मैदानात राहणे महत्त्वाचे होते, मात्र जीवदान मिळूनही ती एक धाव घेण्याच्या नादात धावबाद झाली. सोफी डिवाईनचा (२६ धावा) लक्ष्याचा पाठलाग करतानाचा रेकॉर्ड चांगला असल्याने ती सामना जिंकवून देईल असे वाटत होते, पण तीदेखील फारशी मोठी कामगिरी करू शकली नाही. त्यानंतर संघाचा डाव सावरत रिचाने ५१ धावांच्या खेळीने सर्वांची मने जिंकली.

२९ चेंडूंत चार चौकार आणि तीन षटकार लगावणाऱ्या रिचाने शेवटच्या चेंडूपर्यंत संघाला विजय मिळवून देण्याचा आटोकाट प्रयत्न केला, पण शेवटी विफल ठरला. शेवटच्या चेंडूंत दोन धावा हव्या असताना रिचा मोठा फटका मारायला चुकली अन् एक धाव घेण्याच्या नादात ती बाद झाली. दिल्लीच्या संघाने तिला आळा घालण्यास केलेल्या प्रयत्नांना यश आले आणि एक धावेने विजय मिळवला.

तत्पूर्वी दिल्ली संघाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेत १८१ धावा केल्या होता. जेमिमा रॉड्रीग्ज आणि कॅप्सीच्या दमदार शतकी भागीदारीमुळे संघाला मोठी धावसंख्या उभारण्यात यश आले. मेग लॅनिंग (२९) आणि शेफाली वर्माने (२३) संघाला चांगली सुरुवात करून दिली, त्यानंतर जेमिमाने आठ चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर ५८ धावा, तर कॅप्सीने आठ चौकारांच्या मदतीने ४८ धावा केल्या. आरसीबीकडून युवा फिरकीपटू श्रेयंका पाटीलने २६ धावा देत सर्वाधिक चार विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर आशा शोभनाला एक विकेट घेण्यात यश आले.

## शमी वर्ल्डकपला मुकणार

**नवी दिल्ली** : आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ जूनमध्ये अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये खेळवली जाणार आहे. या स्पर्धेपूर्वी भारतीय संघाला मोठा धक्का बसला आहे. वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी जागतिक दर्जाच्या स्पर्धेतून बाहेर झाला आहे.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) सचिव जय शाह यांनी या वृत्ताला दुजोरा दिला आहे. त्यांनी सांगितले की, मोहम्मद शमी बांगलादेशविरुद्धच्या घरच्या मालिकेत खेळताना दिसण्याची शक्यता आहे. यावरून स्पष्ट झाले आहे की, शमी आयपीएल आणि टी-२० विश्वचषकाला मुकणार आहे. तो टाचेच्या शस्त्रक्रियेसाठी लंडनला गेला होता.


जीवेत् शरद: शतम्!

राजेश मोकल यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक
ध्रुवनाथ कोळी


# न्हावे येथे सरपंच चषक क्रिकेट स्पर्धा

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

न्हावे येथे पार्थ इंटरप्रायझेसच्या वतीने सरपंच चषक २०२४ क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. गावदेवी मैदानात खेळल्या जात असलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. १०) झाले.

उद्घाटन समारंभास न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, उपसरपंच राजेश म्हात्रे, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, माजी सरपंच चंद्रकांत भोईर, हरिश्चंद्र म्हात्रे, माजी उपसरपंच किसन पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, न्हावे ग्रामपंचायत सदस्य सागर ठाकूर, नरेश मोकल, तुषार भोईर, किशोर घरत, जय घरत, चंद्रकांत पाटील, चंद्रकांत जनार्दन पाटील, संदीप सखाराम पाटील, संदीप पाटील, संदीप भोईर, रूपेश घरत, विनोद पाटील, दीपक भोईर, अनिल भोईर, महिला मंडळ अध्यक्ष मीनाक्षी पाटील, महिला मंडळ सदस्य सुनिता भोईर, रंजना घरत, ललिता ठाकूर, जागृती ठाकूर, धनवंती म्हात्रे, सुशीला पाटील, शोभा भोईर, कमलाबाई म्हात्रे आदी उपस्थित होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आयोजकांचे कौतुक करून खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.


भावपूर्ण श्रध्दांजली



कै. नामदेव कृष्णा ठाकुर

स्वतःच्या मनातलं दुःख लपवून नेहमी चेहऱ्यावर आनंद ठेवणारा व्यक्ती म्हणजे बाबा...!
खिशात रुपया देखील नसताना मुलांच्या सर्व इच्छा पूर्ण करणारा व्यक्ती म्हणजे बाबा...!!

होमविधी : सोमवार दि. ४/३/२०२४ रोजी सकाळी ८:३० वा. राहत्या घरी गव्हाण येथे होणार आहे.
दशक्रिया : सोमवार दि.११/३/२०२४ (श्री क्षेत्र मोरावे लांगेश्वर येथे होणार आहे)
उत्तरकार्य : गुरुवार दि. १४/३/२०२४ रोजी दुपारी १२.०० वा राहत्या घरी गव्हाण येथे होणार आहे.

टिप :- कृपया कोणत्याही प्रकारचे दु:खवटे आणू नये.
त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हिच ईश्वर चरणी प्रार्थना...

शोकाकुल : समस्त ठाकुर परिवार, गव्हाण.

: कार्यक्रम :

| | |
|---|---|
| सोमवार, दि.०४/०३/२०२४ रोजी वेळ : सायं. ७.०० वा | श्रीपती बाबा प्रासादिक भजन मंडळ, गव्हाण<br>बुवा - श्री. ज्ञानेश्वरबुवा म्हात्रे, पखवाज : श्री गौरव म्हात्रे |
| मंगळवार, दि.०५/०३/२०२४ रोजी वेळ : सायं. ७.०० वा. | माऊली प्रासादिक मंडळ - गणीगाव कर्जत.<br>बुवा - ह.भ.प. विक्रमबुवा थोरवे, पखवाज : श्री. मनोज देशमुख, तबला श्री. केतन घरत साथः महेश बुवा देशमुख, रमेश बुवा श्रीखंडे |
| बुधवार, दि.०६/०३/२०२४ रोजी वेळ : सायं. ७.०० वा. | गावदेवी प्रासादिक भजन मंडळ न्हावे<br>बुवा श्री. महेश पाटील न्हावे. पखवाज : श्री. सुमित घरत, श्री. महादेव ठाकूर |
| गुरुवार, दि.०७/०३/२०२४ रोजी वेळ : सायं. ७.०० वा. | विठ्ठल प्रासादिक भजन मंडळ नावडे<br>श्री. विकास खानावकर, श्री. राहुल पाटील, श्री. अक्षय खुटारकर, पखवाज : श्री प्रवीण पाटील (वाजे) |
| शुक्रवार, दि. ०८/०३/२०२४ रोजी वेळ : सायं. ७.०० वा | श्री. पांडुरंग प्रासादिक भजन मंडळ (खारघर)<br>गायिका :- कु. प्राप्ती पाटील, पखवाज :- श्री गोरखनाथ पाटील, तबला: कु-धिरज म्हात्रे (खुटारी) |
| शनिवार, दि.०९/०३/२०२४ रोजी वेळ : सायं. ७.०० वा | भीमसेन वाणी<br>बुवा : श्री. जगदिश पाटील वेश्वी पखवाज : श्री. ज्ञानेश्वर खरे, तबला: श्री. सत्यम खरे |
| रविवार, दि.१०/०३/२०२४ रोजी वेळ : सायं. ७.०० वा. | गजानन प्रासादिक भजन मंडळ - मोठी जुई<br>बुवा : श्री. दत्तात्रेयबुवा पाटील, पखवाज : श्री. वैभव पाटील |
| सोमवार, दि.११/०३/२०२४ रोजी वेळ : सायं. ७.०० वा. | गजानन प्रासादिक भजन मंडळ, दारावे<br>गायक- ज्ञानेश्वर भोईर, पखवाज रवींद्र भोईर, भाविक भोईर |
| मंगळवार, दि.१२/०३/२०२४ रोजी वेळ : सायं. ७.०० वा. | लक्ष्मण महाराज प्रासादिक मंडळ - गव्हाण<br>बुवा : श्री. गणपतबुवा म्हात्रे (धा. खांदा), पखवाज : श्री. गौरव म्हात्रे (गव्हाण) |
| बुधवार, दि.१३/०३/२०२४ रोजी वेळ : सायं. ७.०० वा. | ओमकार सांस्कृतिक भजन मंडळ उरण पुर्व विभाग<br>अध्यक्ष : श्री. डि. आर ठाकूर, उपाध्यक्ष : श्री. अशोकबुवा पाटील (जांभुळपाडा) |
| गुरुवार, दि.१४/०३/२०२४ रोजी वेळ : सकाळी. ९.३० वा. | ह.भ.प. प्रकाश बुवा पाटील यांचे तेराव्या निमित्त सुसाव्य किर्तन होईल |



महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन

राष्ट्रीय अंधत्व व दृष्टी क्षीणता नियंत्रण कार्यक्रम

राष्ट्रीय नेत्र ज्योती अभियान

मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री



एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

विशेष मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोहीम

दि. १९ फेब्रुवारी ते ९ मार्च या मोहिमेच्या कालावधीत

१ लाखापेक्षा जास्त मोतिबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीरित्या संपन्न!



मोतीबिंदू ने गेली दृष्टी...
कृत्रिम भिंगारोपणाने पहा सृष्टी ...

मोतीबिंदूची लक्षणे:

- डोळ्यातील नेत्रमणी( लेन्स ) धुसर किंवा पांढरा होणे म्हणजे मोतीबिंदू.
- कोणत्याही प्रकारची वेदना न होता दृष्टी कमी होत जाणे.
- चष्म्याचा नंबर बदलणे.
- मोतीबिंदूचा वयोमानानुसार दोन्ही डोळ्यांवर प्रभाव पडतो



१ लाखापेक्षा जास्त नागरिकांना दृष्टीलाभ !



देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

अजित पवार
उपमुख्यमंत्री

मोतीबिंदूवर कृत्रिम भिंगारोपण शस्त्रक्रिया (आय. ओ. एल) हा पर्याय उपलब्ध आहे.

शासकीय रुग्णालय, मान्यता प्राप्त स्वयंसेवी संस्था रुग्णालय येथे मोतीबिंदू शस्त्रक्रिया केल्या जातात. याचा सर्वांनी लाभ घ्यावा.

अधिक माहितीसाठी आशा, आरोग्य सेवक/सेविका/आरोग्य कर्मचारी किंवा जवळच्या शासकीय रुग्णालयाशी संपर्क साधा.

मोफत आरोग्य सल्ला मिळविण्यासाठी डायल करा टोल फ्री क्रमांक १०४



प्रा. डॉ. तानाजी सावंत
मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

/MahaArogyaIECBureau @MahaHealthIEC /mahahealthiec /MahaHealthIEC

आरोग्य विषयक जनजागृती साहित्य मिळविण्यासाठी शेजारील QR कोड स्कॅन करा